दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक

• वर्ष : ०४ • अंक : ०६१ • पुणे • शुक्रवार, दि. १३ नोव्हेंबर २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313



दैनिक आरंभपर्वमध्ये बातमीदार होण्याची संधी!

पुणे शहरासह संपूर्ण पुणे जिल्ह्यात प्रतिनिधींची नियुक्ती करणे आहे.

अल्पावधीतच पुणे शहरासह जिल्ह्यात नावारूपास आलेल्या **दैनिक आरंभपर्व** या वृत्तपत्रासाठी पुणे शहर, उपनगरे तसेच जिल्ह्यातील विविध तालुके व ग्रामीण भागांमध्ये बातमीदारांची नियुक्ती करण्यात येणार आहे.



पत्रकारितेची आवड असणाऱ्या,
सामाजिक प्रश्नांची जाण असणाऱ्या
आणि आपल्या परिसरातील जनतेचे
प्रश्न निर्भीडपणे मांडण्याची इच्छा असणाऱ्या
उत्साही व्यक्तींना संधी...

नियुक्ती करावयाची ठिकाणे

पुणे शहर व उपनगरे :

कात्रज, वारजे माळवाडी, कर्वेनगर, बाणेर, औंध, कोथरूड, हडपसर, मांजरी, आव्हाळवाडी, मुंढवा, कोरेगाव पार्क, गुजरवाडी, संगमवाडी, येरवडा, वडगाव शेरी, खराडी, वडकी, फुरसुंगी, थेऊर, लोहगाव, विश्रांतवाडी, दिघी आदी परिसर.

- **जुन्नर तालुका –** नारायणगाव, आळेफाटा, बेल्हे, माळशेज, नाणेघाट, शिरोली.
- **आंबेगाव तालुका –** भीमाशंकर, तळघर.
- **खेड तालुका –** खेड, चाकण, बहुळ, वाडा, श्री क्षेत्र आळंदी, सोलू, मरकळ.
- **शिरूर तालुका –** शिरूर, शिक्रापूर, रांजणगाव गणपती, कारेगाव, न्हावरा, तळेगाव ढमढेरे, केंदूर, पाबळ.

हवेली तालुका
उरुळी कांचन, न्हावी सांडस, पेरणे, पिंपरी सांडस.

दौंड तालुका
दौंड शहर, हिंगणगाव, यवत, राहू, पारगाव-शालू-मालू, केडगाव स्टेशन, वरवंड, खुटबाव, गिरीम, कुरकुंभ.

बारामती तालुका
नीरा, सुपा, सोमेश्वरनगर, वालचंदनगर, उंडवडी.

इंदापूर तालुका
वडापुरी, बावडा, सराटी, अंथुर्णे, निमगाव केतकी, भिगवण.

मावळ तालुका
वडगाव मावळ, मळवली, कामशेत, लोणावळा.

मुळशी तालुका
मुळशी शहर, पिरंगुट, पौड रोड, खारावडे म्हसोबा.

इच्छुकांनी संपर्क साधावा

श्री. लक्ष्मण साबळे	श्री. सोमनाथ साळुंके	श्री. प्रतिक गंगणे
८६०५२८४२७२	८४४६७९९३८३	७२७६३१४१४२

पाण्याचा हिशेब राजकारणाचा, तहान मात्र सामान्य जनतेची!

पाणी हा केवळ नैसर्गिक स्रोत नाही, तर मानवी जीवनाचा मूलभूत आधार आहे. मात्र, पाण्याच्या नियोजनाचा प्रश्न निर्माण झाला की प्रशासन, राजकारण आणि लोकप्रतिनिधी यांच्या भूमिकांवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. पुणे शहर आणि ग्रामीण भागातील पाणीवाटपाचा विषय पुन्हा एकदा चर्चेत येत असताना सामान्य नागरिकांच्या मनात एकच प्रश्न आहे, पाण्याचे राजकारण कधी थांबणार आणि पाणीपुरवठ्याचे नियोजन कधी सुधारणार?

संपादकाय
विचार आजचा... दिशा उद्याची...

धरणात किती पाणीसाठा आहे, शहरासाठी किती पाणी राखीव ठेवायचे, ग्रामीण भागाला किती पाणी द्यायचे, यावर बैठका होतात. आकडेवारी मांडली जाते, दावे-प्रतिदावे केले जातात आणि राजकीय श्रेयवादही रंगतो. मात्र, या सगळ्या चर्चेत सर्वसामान्य नागरिकांच्या पाण्याच्या प्रश्नाला किती प्राधान्य मिळते, हा खरा विचार करण्याचा मुद्दा आहे. शहरातील नागरिकांना नियमित पाणी मिळावे, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पुरेसे पाणी उपलब्ध व्हावे आणि औद्योगिक क्षेत्राची गरजही भागवली जावी, या सर्व अपेक्षा रास्त आहेत. परंतु मर्यादित जलसाठ्याचे न्याय्य आणि शास्त्रीय नियोजन करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. पाण्याचे वाटप करताना शहर विरुद्ध ग्रामीण भाग असा संघर्ष निर्माण होणे ही दुर्दैवी बाब आहे. पाणी हा कोणत्याही एका घटकाचा मक्तेदारीचा विषय नसून सर्वांचा समान हक्क आहे.

आज अनेक भागांत नागरिकांना पाण्यासाठी प्रतीक्षा करावी लागते. काही ठिकाणी कमी दाबाने पाणीपुरवठा होतो, तर काही भागांत टँकरवर अवलंबून राहावे लागते. दुसरीकडे पाण्याची गळती, अनधिकृत जोडण्या, नियोजनाचा अभाव आणि जलस्रोतांचे प्रदूषण यांसारख्या समस्या कायम आहेत. मग केवळ पाणीवाटपाच्या आकड्यांवर चर्चा करून प्रश्न सुटणार कसा?



पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे, हे केवळ भाषणांतून सांगून उपयोग नाही. धरणातील पाणीसाठ्याचे पारदर्शक नियोजन, पाणीवाटपाचे वास्तववादी धोरण, गळती रोखण्यासाठी ठोस उपाययोजना, सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर आणि पावसाचे पाणी साठवण्याची प्रभावी व्यवस्था यांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. लोकप्रतिनिधींनीही पाण्याच्या प्रश्नाकडे राजकीय प्रतिष्ठेचा विषय म्हणून पाहण्याऐवजी लोकहिताचा प्रश्न म्हणून पाहिले पाहिजे. आरोप-प्रत्यारोपांपेक्षा समन्वयातून मार्ग काढणे अधिक महत्त्वाचे आहे. प्रशासनानेही नागरिकांना अचूक माहिती देऊन पाणीवाटपाचा हिशेब सार्वजनिक करावा. कोणाला किती पाणी मिळते, किती पाणी वाया जाते आणि भविष्यातील गरजांसाठी काय नियोजन आहे, याची माहिती जनतेसमोर असली पाहिजे. पाणीटंचाई ही केवळ उन्हाळ्यात आठवण होणारी समस्या नाही. ती वर्षभराच्या नियोजनाशी संबंधित आहे. आज नियोजन केले नाही, तर उद्या संघर्ष अटळ आहे. त्यामुळे राजकीय इच्छाशक्ती, प्रशासकीय कार्यक्षमता आणि नागरिकांचा सहभाग या तिन्हींची सांगड घालणे गरजेचे आहे. शेवटी प्रश्न एवढाच आहे की, पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा हिशेब जनतेला द्यायचा की जनतेनेच प्रत्येक थेंबासाठी संघर्ष करायचा? बैठकीतील पाण्याचे आकडे नागरिकांची तहान भागवत नाहीत. त्यासाठी नळातून प्रत्यक्ष पाणी आले पाहिजे. कारण पाण्याच्या प्रश्नावर राजकारण करणाऱ्यांना कदाचित तहानेची जाणीव नसेल; पण सामान्य माणसाला मात्र पाण्याचे महत्त्व रोजच्या जगण्यातून समजत असते!

थोडक्यात पण महत्वाचे



पुण्यातील CBSE राष्ट्रीय जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत ओडिशाच्या खेळाडूंची भरारी

- AM/NS इंडियाच्या खेळाडूंनी पटकावली चार सुवर्ण, पाच रौप्य आणि दोन कांस्यपदके; राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी

पुणे (आरंभ पर्व) : पुण्यात आयोजित CBSE राष्ट्रीय जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धा २०२६ मध्ये ओडिशा AM/NS इंडिया जिम्नॅस्टिक्स हाय परफॉर्मन्स सेंटर, भुवनेश्वर आणि ग्रासरूट सेंटर, राउरकेला येथील युवा खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत पदकांची लयलूट केली. या स्पर्धेत खेळाडूंनी एकूण चार सुवर्ण, पाच रौप्य आणि दोन कांस्य अशी ११ पदके पटकावून आपल्या कौशल्याचा ठसा उमटवला. देशभरातील ३५० हून अधिक युवा जिम्नॅस्ट्सनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. ओडिशा AM/NS इंडियाच्या जिम्नॅस्टिक्स कार्यक्रमातील एकूण १३ खेळाडूंनी विविध शाळांचे प्रतिनिधित्व करत स्पर्धेत भाग घेतला. भुवनेश्वर येथील हाय परफॉर्मन्स सेंटरच्या प्रीती झंकार, सुभिदिता बाग, शौम्यश्री प्रियदर्शिनी, जास्मिन प्रहराज आणि रोज मिन्झी यांनी विविध वयोगटांत सहभाग नोंदवला. तर राउरकेला येथील ग्रासरूट सेंटरच्या खेळाडूंनी प्रथमच राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत आपले कौशल्य दाखवले. या स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलींच्या गटात प्रीती झंकारने ऑल-अराउंड आणि बॅलन्स बीम या दोन्ही प्रकारांत सुवर्णपदके मिळवली. ११ वर्षांखालील मुलींच्या गटात रोज मिन्झीने ऑल-अराउंड आणि बॅलन्स बीममध्ये दोन सुवर्णपदके, तर फ्लोअर एक्सरसाइजमध्ये रौप्यपदक पटकावले. १४ वर्षांखालील मुलींच्या गटात शौम्यश्री प्रियदर्शिनीने बॅलन्स बीममध्ये रौप्य आणि वॉल्टमध्ये कांस्यपदक मिळवले. याच गटात सुभिदिता बागने अनइव्हन बार्स आणि वॉल्ट या प्रकारांत दोन रौप्यपदकांची कमाई केली. दरम्यान, राउरकेला येथील ग्रासरूट सेंटरच्या ११ वर्षांखालील मुलांच्या गटातील प्रणबजैन महाला याने पॅरलल बार्समध्ये कांस्यपदक जिंकून लक्षवेधी कामगिरी केली.



मेडिकोव्हर हॉस्पिटल्स यांना प्रतिष्ठित 'QAI' राष्ट्रीय मानांकन जाहीर

पुणे (आरंभ पर्व) : आरोग्य सेवांच्या क्षेत्रात अग्रेसर असलेल्या पिंपरी-चिंचवडमधील मेडिकोव्हर हॉस्पिटल्स, केएलई, पुणे (सहरुदया हेल्थकेअर प्रा. लि. युनिट, सेक्टर नं. १, इंद्रायणी नगर, भोसरी) या नामांकित रुग्णालयाने वैद्यकीय गुणवत्तेमध्ये एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. रुग्णालयाला 'क्वालिटी अँड अॅक्रेडीटेशन इन्स्टिट्यूट' (QAI) कडून 'स्ट्रोक सेंटर' (Stroke Centre - 1st Edition) चे अत्यंत प्रतिष्ठित राष्ट्रीय मानांकन प्रदान करण्यात आले आहे. ही मान्यता २२ ऑक्टोबर २०२६ पासून ते २१ ऑक्टोबर २०२९ पर्यंत वैध असणार आहे. QAI ही संस्था आरोग्य सेवा क्षेत्रातील गुणवत्तेसाठी जागतिक स्तरावर (ISQua EEA मान्यताप्राप्त) ओळखली जाते. स्ट्रोक (लकवा/पक्षघात) सारख्या जीवघेण्या आजाराच्या रुग्णांवर तातडीने, अचूक आणि आंतरराष्ट्रीय निकषांनुसार उपचार करणाऱ्या मोजक्याच निवडक रुग्णालयांमध्ये आता मेडिकोव्हर हॉस्पिटल्सचा समावेश झाला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल बोलताना रुग्णालयाचे व्यवस्थापन आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमने सांगितले की, "हा पुरस्कार आमच्या उच्च दर्जाच्या वैद्यकीय सेवा, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि रुग्णांच्या सुरक्षेप्रती असलेल्या आमच्या कटिबद्धतेची पावती आहे. स्ट्रोकसारख्या आपत्कालीन स्थितीत 'गोल्डन अवर' (पहिला महत्त्वाचा तासाभराचा अवधी) अतिशय महत्त्वाचा असतो. या प्रमाणपत्रावरून स्पष्ट होते की आमचे रुग्णालय रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी आणि त्यांना लवकरात लवकर बरे करण्यासाठी सर्वतोपरी तयार आहे." या प्रमाणपत्रासाठी QAI चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भूपेंद्र कुमार राणा आणि CAHSC चे अध्यक्ष प्रा. (डॉ.) महेश चंद्र मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली कठोर मूल्यमापन करण्यात आले होते. या यशामुळे पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील नागरिकांना आता पक्षाघातावर अधिक विश्वासार्ह आणि जागतिक दर्जाचे उपचार आपल्या जवळच उपलब्ध होणार आहेत.

रस्ते सुरक्षा जनजागृतीसाठी बजाज जनरल इन्श्युरन्सचा पुढाकार

- येरवडा मेट्रो स्थानकावर डिजिटल शाखेचे उद्घाटन
- थर्ड-पार्टी विमा, 'पीएम-राहत' आणि 'राह-वीर' योजनांची माहिती मिळणार



पुणे (दै. आरंभ पर्व)

रस्ते अपघातांमध्ये जखमी होणाऱ्या नागरिकांना वेळेवर मदत मिळावी, वाहनधारकांमध्ये विम्याबाबत जागरूकता निर्माण व्हावी आणि अपघातग्रस्तांसाठी केंद्र सरकारच्या मदत योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने बजाज जनरल इन्श्युरन्सने पुणे वाहतूक पोलिसांच्या सहकार्याने विशेष जनजागृती मोहीम सुरू केली आहे. या उपक्रमांतर्गत येरवडा येथील बजाज जनरल मेट्रो स्थानकावर डिजिटल शाखेचे उद्घाटन करण्यात आले. या डिजिटल शाखेच्या माध्यमातून दररोज हजारो मेट्रो प्रवाशांना थर्ड-पार्टी मोटर विम्याची माहिती मिळणार आहे. वाहनधारकांना स्थानकावरील क्यूआर कोड स्कॅन करून आपल्या वाहनाच्या विम्याची वैधता तपासता येणार असून, विमा सक्रिय नसल्यास काही मिनिटांत डिजिटल पद्धतीने नवीन पॉलिसी खरेदी करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. मोटार वाहन कायदा १९८८ नुसार थर्ड-पार्टी मोटर विमा अनिवार्य आहे. अपघातामध्ये तृतीय पक्षाला होणाऱ्या आर्थिक नुकसानीपासून संरक्षण देण्यामध्ये या विम्याची महत्त्वपूर्ण भूमिका असते. मात्र, अनेक वाहने वैध विम्याशिवाय रस्त्यावर धावत असल्याने अपघातानंतर आर्थिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेऊन वाहनधारकांनी विम्याबाबत जागरूक राहावे, यासाठी कंपनीकडून प्रयत्न केले जात आहेत. या मोहिमेद्वारे केंद्र सरकारच्या 'राह-वीर' आणि 'पीएम-राहत' या योजनांचीही माहिती दिली जाणार आहे. 'राह-वीर' योजनेंतर्गत अपघातातील जखमींना गोल्डन अवरमध्ये रुग्णालयात पोहोचवून मदत करणाऱ्या नागरिकांचा सन्मान केला जातो. तर 'पीएम-राहत' योजनेंतर्गत पात्र अपघातग्रस्तांना कॅशलेस वैद्यकीय उपचारांची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. नागरिकांनी अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी पुढाकार घ्यावा आणि सरकारी योजनांचा लाभ कसा मिळवता येईल, याची माहिती घ्यावी, हा या मोहिमेचा प्रमुख हेतू आहे.

पॉलिसीबाझारचा 'हेल्थ ऑन ग्राउंड सपोर्ट' उपक्रम

मुंबई (दै. आरंभ पर्व)

आरोग्य विम्याच्या दाव्यांची प्रक्रिया सुलभ करण्याच्या उद्देशाने पॉलिसीबाझारच्या 'हेल्थ ऑन ग्राउंड सपोर्ट' या उपक्रमांतर्गत जुलै ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत ४३८ शहरांमध्ये एकूण २२,३४१ भेटी देण्यात आल्या. या उपक्रमाद्वारे ग्राहकांना ₹३२.४८ कोटींच्या विमा दाव्यांच्या निपटाऱ्यासाठी मदत करण्यात आली. कंपनीची ही सेवा डिजिटल आणि दूरध्वनीवरील मदतीच्या पुढे जाऊन ग्राहकांना रुग्णालयांमध्ये तसेच त्यांच्या घरी प्रत्यक्ष वैयक्तिक सहाय्य उपलब्ध करून देते. रुग्णालयात दाखल झाल्यानंतर कुटुंबीयांना कॅशलेस विमा दाव्याची मंजुरी, आवश्यक कागदपत्रे आणि बिलांची पूर्तता तसेच विमा कंपन्यांशी समन्वय साधणे अशा अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते.

अशा कठीण काळात ग्राहकांना दिलासा देण्यासाठी पॉलिसीबाझारने हा उपक्रम सुरू केला आहे. ही सेवा ४३८ शहरांमध्ये पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध आहे. ग्राहक पॉलिसीबाझार ॲपमधील एसओएस (SOS) बटणाद्वारे किंवा आपल्या रिलेशनशिप मॅनेजरशी संपर्क साधून या सेवेची मागणी करू शकतात. याशिवाय, कंपनी १२,००० हून अधिक पिनकोड क्षेत्रांमध्ये ग्राहकांना त्यांच्या घरी जाऊन योग्य आरोग्य विमा निवडण्यासाठीही मदत करते.



टाटा मोटर्स आणि टर्नोची भागीदारी

मुंबई (दै. आरंभ पर्व)

इलेक्ट्रिक व्यावसायिक वाहनांचा वापर वाढविण्यासह ग्राहकांसाठी वाहन खरेदी अधिक सुलभ करण्याच्या उद्देशाने टाटा मोटर्सने भारतातील बॅटरी इंटेलिजन्स आणि लाइफसायकल व्यवस्थापन क्षेत्रातील कंपनी फिंझो ईव्ही सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड (टर्नो) सोबत सामंजस्य करार केला आहे. या भागीदारीअंतर्गत टाटा मोटर्सच्या इलेक्ट्रिक स्मॉल कमर्शियल व्हेईकल्स आणि पिकअप्स (ई-एससीव्हीपीयू) ग्राहकांना विशेष वित्तपुरवठा योजना उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या सहयोगामुळे ग्राहकांना जलद कर्ज वितरण, परतफेडीचे लवचिक पर्याय आणि २५ टक्के ॲश्युअर्ड बायबॅक गॅरंटीचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे इलेक्ट्रिक व्यावसायिक वाहनांच्या खरेदीसह भविष्यातील पुनर्विक्रीबाबतही ग्राहकांचा विश्वास वाढण्यास मदत होणार आहे. टर्नोचे संचालक वरुण नायर म्हणाले की, इलेक्ट्रिक वाहनांची मालकी अधिक सोपी आणि फायदेशीर बनवून देशात हरित व शून्य-उत्सर्जन वाहतुकीला गती देणे हे कंपनीचे उद्दिष्ट आहे.

एसबी रिअल्टीच्या ब्रँड ॲम्बेसेडरपदी अभिनेता शरद केळकर

- 'स्पेसेस दॅट ब्रीद' जाहिरात मोहीम सुरू
- नैसर्गिक प्रकाश, शुद्ध हवा आणि हिरवळीने समृद्ध घरांची संकल्पना



पुणे (दै. आरंभ पर्व)

पुण्यातील रिअल इस्टेट क्षेत्रातील नामांकित कंपनी एसबी रिअल्टीने प्रसिद्ध अभिनेता शरद केळकर यांची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे. यानिमित्त कंपनीने 'स्पेसेस दॅट ब्रीद' ही नवीन ब्रँड जाहिरात मोहीम सुरू केली आहे. घर आणि कामाच्या ठिकाणी नैसर्गिक प्रकाश, शुद्ध हवा, हिरवळ आणि मोकळ्या जागांचे महत्त्व अधोरेखित करणारी ही मोहीम आहे. एसबी रिअल्टीने रिअल इस्टेट क्षेत्रात सहा वर्षांहून अधिक काळात पुण्यात १० लाख चौरस फुटांपेक्षा अधिक क्षेत्रफळाचे प्रकल्प पूर्ण केले आहेत. सध्या २० लाख चौरस फुटांपेक्षा अधिक क्षेत्रफळाचे निवासी व व्यावसायिक प्रकल्प बांधकामाधीन असून, आगामी काळात ५० लाख चौरस फुटांपेक्षा अधिक क्षेत्रफळाचे प्रकल्प सुरू करण्याचे कंपनीचे नियोजन आहे.

अभिनेता शरद केळकर यांनी विविध भाषांमधील चित्रपट आणि दूरचित्रवाणी मालिकांमधून देशभरातील प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. त्यांचा प्रभावी अभिनय, साधेपणा आणि आपलेपणाची भावना एसबी रिअल्टीच्या विश्वास, आकांक्षा आणि नात्यांमधील जिव्हाळा या मूल्यांशी सुसंगत असल्याचे कंपनीने म्हटले आहे. या जाहिरात चित्रपटात शरद केळकर धावपळीच्या जीवनातून थोडा वेळ काढून घरातील शांत आणि प्रसन्न वातावरणाचा आनंद घेताना दिसतात. झोपाळ्यावर बसून पुस्तक वाचणे, मोकळ्या जागेत वेळ घालवणे आणि कुटुंबासोबत आनंदाचे क्षण अनुभवणे अशा प्रसंगांतून घराचे खरे समाधान आणि घरपण अधोरेखित करण्यात आले आहे.

कंपनीच्या 'ऑक्सिजनेटेड होम्स' या संकल्पनेतून घरांमध्ये नैसर्गिक प्रकाश, खेळती हवा आणि हिरवळीने वेढलेल्या मोकळ्या जागांना प्राधान्य दिले जाते. केवळ निवासी प्रकल्पच नव्हे, तर कार्यालये आणि व्यावसायिक जागांच्या निर्मितीतही मानवी गरजा आणि आरामदायी वातावरणाला महत्त्व दिले जात असल्याचे कंपनीने स्पष्ट केले.

टाइप १ डायबिटीस रुग्णांना मिळणार विशेष उपचार

मधुमेह व बालदिनानिमित्त स्वीटलिंग्ज सेंटरतर्फे १४ ते २१ नोव्हेंबरदरम्यान जनजागृती अभियान

स्वीटलिंग्ज सेंटरमध्ये सध्या 'टाइप १' मधुमेह असलेल्या ८५० हून अधिक मुलांची सर्वंकष काळजी घेतली जाते. नागपूर आणि कोल्हापूर येथेही ही सुविधा पुरविण्यात येत आहे. वैद्यकीय उपचारांसोबतच आहारविषयक मार्गदर्शन, मधुमेह शिक्षण आणि मानसिक-सामाजिक आधारही दिला जातो. तसेच याठिकाणी मुलांना खेळण्यासाठी मोकळे वातावरण तयार करण्यात आल्याने मुले इथे येताना कंटाळा करणार नाहीत असा प्रयत्न करण्यात आला आहे. जागतिक मधुमेह दिनानिमित्त १४ नोव्हेंबरला टाइप १ मधुमेह असलेल्या वंचित मुलांसाठी विशेष कार्निव्हल, तर २१ नोव्हेंबरला तरुणांसाठी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, असे डॉ. खाडिलकर यांनी सांगितले.

पुणे (दै. आरंभ पर्व)

मधुमेहाचे वाढते प्रमाण लक्षात घेता त्याचे वेळीच निदान, प्रतिबंधात्मक उपाय आणि योग्य उपचार याबाबत जनजागृती करण्यासाठी जहांगीर हॉस्पिटलच्या हिराबाई कावसजी जहांगीर मेडिकल रिसर्च इन्स्टिट्यूट (एचसीजेएमआरआय) अंतर्गत कार्यरत स्वीटलिंग्ज सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर टाइप १ डायबिटीसतर्फे पुण्यात विशेष जनजागृती व मोफत मधुमेह जोखीम तपासणी अभियान राबविण्यात येणार आहे. जागतिक मधुमेह दिन व राष्ट्रीय बालदिनानिमित्त १४ ते २१ नोव्हेंबरदरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती स्वीटलिंग्ज सेंटरच्या संचालिका व बालरोगतज्ज्ञ डॉ. अनुराधा खाडिलकर व डॉ. वामन खाडिलकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी जहांगीर रुग्णालयाच्या जनसंपर्क अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी आरती इराणी, वैद्यकीय अधिकारी दीपाली लडकत, स्वीटलिंग सेंटर प्रकल्प प्रमुख मोहनीश वाघ व जनसंपर्क अधिकारी नीरज रासकर उपस्थित होते. डॉ. अनुराधा खाडिलकर म्हणाल्या, "यंदाच्या जागतिक मधुमेह दिनाची २०२६-२७ या वर्षासाठीची संकल्पना 'मधुमेहावर वेळीच कृती' अशी आहे. मधुमेहाचे लवकर निदान आणि जोखीम कमी करण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनांचे महत्त्व या माध्यमातून अधोरेखित करण्यात येत आहे. आंतरराष्ट्रीय मधुमेह महासंघाच्या (आयडीएफ) अंदाजानुसार, २०५० पर्यंत जगभरातील मधुमेहग्रस्त प्रौढांची संख्या ८५ कोटी ३० लाखांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. विशेषतः 'टाइप १ मधुमेहा'चा लहान मुले आणि किशोरवयीन मुलांमधील वाढता धोका चिंताजनक आहे. भारतात २० वर्षांखालील सुमारे तीन लाख एक हजार मुले व किशोरवयीन मुले 'टाइप १' मधुमेहाने ग्रस्त असून, हा आकडा जगातील सर्वाधिक आहे.



'टाइप १' मधुमेहामध्ये शरीराची रोगप्रतिकारक यंत्रणा स्वादुपिंडातील इन्सुलिन तयार करणाऱ्या पेशींवर हल्ला करते. त्यामुळे शरीरात इन्सुलिनची निर्मिती अत्यल्प किंवा बंद होते. अशा रुग्णांना आयुष्यभर इन्सुलिन उपचारांची आवश्यकता असते. हा आजार जीवनशैलीतील बदलांमुळे टाळता येत नाही. याउलट टाइप २ मधुमेह हा शरीर इन्सुलिनचा प्रभावी वापर करू शकत नसल्यामुळे होतो, असेही त्यांनी नमूद केले. डॉ. वामन खाडिलकर म्हणाले, "अतितहान लागणे, वारंवार लघवी होणे, विनाकारण वजन कमी होणे आणि सतत थकवा जाणवणे ही मधुमेहाची प्रमुख लक्षणे आहेत. लहान मुलांमध्ये पूर्वी बंद झालेले अंथरुण ओले करणे, भूक वाढणे, अशक्तपणा आणि हालचाली कमी होणे हीदेखील लक्षणे दिसू शकतात. या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास गंभीर गुंतागुंत होण्याची शक्यता असते. या अभियानांतर्गत पुण्यातील सार्वजनिक उद्याने तसेच पोलिस कर्मचाऱ्यांसाठीही तपासणी व जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये रक्तातील साखरेची तपासणी, बॉडी मास इंडेक्स (बीएमआय) आणि कंबरेचा घेर मोजणे यांचा समावेश असेल. तसेच आहार, व्यायाम आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तपासणीत जोखीम आढळणाऱ्या व्यक्तींना पुढील वैद्यकीय तपासणीचा सल्ला दिला जाणार आहे. टाईप १ मधुमेहावर उपचार म्हणून अद्याप कोणतीही औषधे उपलब्ध नसून इन्सुलिनचे इंजेक्शन हा एकमेव पर्याय आहे त्यामुळे मुलांना इंजेक्शन घेण्याशिवाय पर्याय नसतो."

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शुक्रवार, दि. १३ नोव्हेंबर २०२६
३



विधी विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध वाटा उलगडल्या

रायसोनी स्कूल ऑफ लॉतर्फे विशेष अतिथी व्याख्यानांचे आयोजन; न्यायिक सेवा परीक्षा आणि कायदे क्षेत्रातील संधींवर मार्गदर्शन



पुणे (दै. आरंभ पर्व)


विधी क्षेत्रात करिअर घडविताना केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून न्यायालयीन कामकाजाची समज, व्यावहारिक कौशल्ये आणि व्यावसायिक नैतिकता आत्मसात करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना न्यायिक सेवा परीक्षेची तयारी तसेच कायदे क्षेत्रातील करिअरच्या विविध संधींची माहिती मिळावी, या उद्देशाने जी. एच. रायसोनी इंटरनॅशनल स्किल टेक युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ लॉतर्फे दोन विशेष अतिथी व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. येरवडा येथील विद्यापीठ परिसरात मंगळवारी (दि. ३) हा उपक्रम उत्साहात पार पडला.

पहिल्या सत्रात कौटुंबिक न्यायालयाच्या न्यायाधीश रफिया खान यांनी 'जेएमएफसी परीक्षेच्या तयारीचा आराखडा व यशस्वी वाटचाल' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. परीक्षेचे स्वरूप, अभ्यासाचे नियोजन, कायद्याच्या कलमांचा सखोल अभ्यास, संदर्भग्रंथांचा प्रभावी वापर आणि सातत्यपूर्ण तयारीचे महत्त्व त्यांनी विशद केले. योग्य नियोजन, चिकाटी आणि अभ्यासातील सातत्य यांच्या जोरावर न्यायिक सेवा परीक्षेत यश मिळवता येते, असे त्यांनी सांगितले.

दुसऱ्या सत्रात महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य ॲड. गणेश शिरसाट यांनी 'बियॉण्ड द लॉ डिग्री' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. वकिली, न्यायिक सेवा, कॉर्पोरेट क्षेत्र, कायदेविषयक सल्लागार, संशोधन अशा विविध क्षेत्रांमध्ये उपलब्ध असलेल्या करिअरच्या संधींची त्यांनी माहिती दिली. विधी क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी कायद्याचे सखोल ज्ञान, प्रभावी संवादकौशल्य, विनम्रता आणि व्यावसायिक नैतिकता या गुणांची आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

या उपक्रमाला संस्थेचे अध्यक्ष सुनील रायसोनी, कार्यकारी संचालक श्रेयश रायसोनी, कुलगुरू डॉ. आर. डी. खराडकर आणि प्र-कुलगुरू डॉ. वैभव हेंद्रे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी अधिष्ठाता डॉ. सारिका करंजुले, डॉ. हनुमंत दोडके, प्रा. संगीता रावखंडे आणि प्रा. प्रदुम्नी पटेल उपस्थित होते. एलएल.बी., एलएल.एम. आणि बी.ए. एलएल. बी. अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी व्याख्यानांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सूत्रसंचालन अमोल तिवारी यांनी केले.

डॉ. हनुमंत दोडके यांच्या पुस्तकाचे अनावरण



कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे स्कूल ऑफ लॉचे सहायक प्राध्यापक डॉ. हनुमंत दोडके लिखित 'द न्यू लॉ ऑफ इव्हिडन्स इन इंडिया : ॲन ॲनालिटिकल कॉमेंटरी ऑन भारतीय साक्ष अधिनियम २०२३' या पुस्तकाचे अनावरण करण्यात आले. महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य ॲड. गणेश शिरसाट यांच्या हस्ते आणि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. डी. खराडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. विद्यार्थ्यांना न्यायिक सेवा परीक्षेची दिशा, विधी क्षेत्रातील करिअरच्या संधी आणि कायद्याच्या अभ्यासातील संशोधनात्मक दृष्टिकोन मिळवून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

थोडक्यात पण महत्वाचे



प्रधानमंत्री आवास योजना गृहप्रवेश सोहळा उत्साहात संपन्न

दौंड (आरंभ पर्व) : दौंड तालुक्यातील लिंगाळी ग्रामपंचायतीच्या वतीने प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या घरकुलांच्या लाभार्थ्यांचा गृहप्रवेश सोहळा दिवाळी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात पार पडला. अनेक वर्षांपासून स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पाहणाऱ्या लाभार्थ्यांचे स्वप्न या योजनेच्या माध्यमातून साकार झाले. या कार्यक्रमाला पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल बाबा जगदाळे, डॉ. सौ. संगीताताई वीरधवल जगदाळे, काशिनाथ जगदाळे, दौंड कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती संदीप येडे, ग्रामपंचायत लिंगाळीचे माजी सदस्य संजीव गावडे, अर्जुन जगदाळे यांच्यासह गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी लाभार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, आर्थिक परिस्थितीमुळे स्वतःचे घर बांधणे शक्य नव्हते. मात्र, प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून घरकुल मंजूर झाल्याने स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे. या संपूर्ण प्रक्रियेत ग्रामपंचायत अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन व सहकार्य मोलाचे ठरल्याचे सांगत लाभार्थ्यांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. दिवाळी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर नवीन घरात प्रवेश करताना लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान ओसंडून वाहत होते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना हक्काचा निवारा उपलब्ध करून देणाऱ्या शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचे हे यशस्वी उदाहरण ठरले. लिंगाळीतील या गृहप्रवेश सोहळ्यामुळे गावात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

सज्ञान महिलेला दबावाशिवाय जोडीदार निवडण्याचा अधिकार



- पोलिस संरक्षणाची मागणी करणाऱ्या २१ वर्षीय हिंदू महिलेला दिलासा

मुंबई (आरंभ पर्व) : धर्म, जात किंवा श्रद्धा काहीही असले तरी सज्ञान महिलेला आपला जीवनसाथी निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे, अशी टिपणी करत मुंबई उच्च न्यायालयाने मुस्लिम पुरुषाशी विवाह केल्यानंतर कुटुंबाकडून धमक्या मिळत असल्याने पोलिस संरक्षणाची मागणी करणाऱ्या २१ वर्षीय हिंदू महिलेला दिलासा दिला. एका महिलेने दाखल केलेल्या फौजदारी रिट याचिकेवर सुनावणी करताना न्या. अद्वैत एम. सेठना व न्या. रणजितसिंह राजा भोसले यांच्या सुट्टीकालीन खंडपीठाने ही टिपणी केली. पतीसोबत राहण्यासाठी संरक्षण मिळण्याच्या मागणीसाठी महिलेने न्यायालयात धाव घेतली होती. या महिलेचे चार-पाच वर्षांपासून २१ वर्षीय मुस्लिम तरुणासोबत संबंध होते. दोन्ही कुटुंबांना त्यांच्या नात्याबद्दल माहिती होती. या जोडप्याने १९ ऑक्टोबर २०२६ रोजी विवाह केला. त्यानंतर त्यांनी संरक्षणासाठी पोलिसांशी संपर्क साधला. मात्र, धारावी पोलिसांनी कारवाईस नकार दिल्याचा आरोप महिलेने याचिकेत केला होता. पालकांनी आपल्याला जबरदस्तीने उत्तर प्रदेशात नेल्याचा दावाही तिने केला. मुंबईत परतल्यानंतर तिने आपल्या सुरक्षेबद्दल चिंता व्यक्त करत उच्च न्यायालयात याचिका दाखल करीत पतीसोबत राहण्यासाठी संरक्षण मागितले. संबंधित महिला सज्ञान आणि आयुष्याशी संबंधित निर्णय घेण्यास पूर्णपणे सक्षम आहे, असे सांगत महिलेची बाजू मांडताना ॲड. आर. के. मेंदाडकर यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या २०१८ मधील 'शफीन जहाँ विरुद्ध अशोकन के. एम.' या खटल्याच्या निकालाचा दाखला दिला. या निकालात पसंतीच्या व्यक्तीशी विवाह करण्याचा अधिकार हा घटनेच्या कलम २१ अंतर्गत 'जीवित आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या अधिकाराचा' महत्त्वाचा भाग मानला गेला आहे. याचिकाकर्त्याच्या वकिलांनी पोलिस अधिकाऱ्यांच्या वागणुकीबद्दलही चिंता व्यक्त केली. मात्र, खंडपीठाने या आरोपांवर विशेष टिपणी न करता पोलिसांनी कायद्यानुसार कठोरपणे काम करावे, असे स्पष्ट केले. या टप्प्यावर, आम्ही या प्रकरणात टिपणी करणे योग्य समजत नाही, असे खंडपीठ म्हणाले.

पंजाबमध्ये 'आप'चे धाडसी पाऊल

मुंबई (आरंभ पर्व) : पंजाबमधील सत्ताधारी आम आदमी पक्षाने आगामी विधानसभा निवडणुकीसाठी (दि.१२ नोव्हेंबर) उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. या यादीत ३१ नावांचा समावेश आहे. नवी दिल्ली येथे पक्षाचे निमंत्रक अरविंद केजरीवाल यांच्या निवासस्थानी झालेल्या 'पॉलिटिकल अफेअर्स कमिटी'च्या (PAC) बैठकीनंतर या उमेदवारांवर शिक्कामोर्तब करण्यात आले. विधानसभेसाठी दुसऱ्या यादीत आपने गुरमीत सिंग 'मीत' हायर यांना बरनाला मतदारसंघातून, तर दीपक बाली यांना जालंधर कॅन्टोन्मेंट मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. पक्षाने दोन खासदारांनाही निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. 'मीत' हायर हे सध्या संगरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार आहेत; त्यांना आता बरनाला विधानसभा जागेसाठी उमेदवार म्हणून घोषित करण्यात आले आहे. आपने विधासनभेसाठी आठ विद्यमान आमदारांना उमेदवारी नाकारली आहे. कॅबिनेट मंत्री गुरमीत सिंग खुडियन यांना लांबी मतदारसंघातून उमेदवारी नाकारण्यात आली असून, त्यांच्या जागी त्यांचे पुतणे रणधीर सिंग धिरा यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

महिला आरक्षणासाठी संसदेच्या विशेष अधिवेशनाच्या हालचाली

मुंबई (आरंभ पर्व) :संसद आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण लागू करण्याशी संबंधित घटनादुरुस्ती विधेयक मंजूर करण्यासाठी केंद्र सरकार संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याच्या तयारीत असल्याची माहिती सरकारी सूत्रांनी दिली आहे. हे विधेयक १५ ते १८ मतांच्या फरकाने मंजूर होईल, असा विश्वासही सूत्रांकडून व्यक्त करण्यात आला आहे. सरकारी सूत्रांनुसार, १७ एप्रिल रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या विशेष बैठकीत अशाच प्रकारचे विधेयक आवश्यक संख्याबळाअभावी मंजूर होऊ शकले नव्हते. आता २०२९ च्या लोकसभा निवडणुकांपूर्वी महिला आरक्षण कायदा लागू करण्यासाठी सरकारने नवीन मसुदा तयार केला आहे.

कोल्हे दाम्पत्याचा पुढाकार; पाच लाखांचा धनादेश सुपूर्द



- मोहोळ यांच्या आवाहनाला प्रतिसाद
- धनश्री कोल्हे आणि दत्ताभाऊ कोल्हे यांची शेतकऱ्यांसाठी मदत

पुणे (दै. आरंभ पर्व)

दुष्काळाच्या संकटामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकरी कुटुंबांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, यासाठी पुण्यातील कोल्हे दाम्पत्याने पाच लाख रुपयांची मदत दिली आहे. केंद्रीय राज्यमंत्री तथा खासदार मुरलीधर मोहोळ यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचे आवाहन केले होते. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका धनश्री कोल्हे आणि भाजप ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव दत्ताभाऊ कोल्हे यांनी पाच लाख रुपयांचा धनादेश मदतनिधीसाठी सुपूर्द केला. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांची भेट घेऊन दत्ताभाऊ कोल्हे यांनी प्रत्यक्ष रक्तदान केले. त्यानंतर मोहोळ यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. याचवेळी दुष्काळग्रस्त शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी पाच लाख रुपयांचा धनादेश त्यांच्याकडे देण्यात आला. दुष्काळामुळे शेतीचे नुकसान झाल्याने अनेक शेतकरी कुटुंबांसमोर आर्थिक प्रश्न उभे राहिले आहेत. अशा परिस्थितीत दिवाळीसारखा सण साजरा करताना त्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही बाब लक्षात घेऊन मोहोळ यांनी शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घेतला. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत कोल्हे दाम्पत्याने मदतीचा हात पुढे केला.

कातकरी बांधवांची दिवाळी गोड

सिंहगड पत्रकार संघाचा सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम

सिंहगड रोड (दै. आरंभ पर्व)

दिवाळीचा सण म्हणजे आनंद, उत्साह आणि आपुलकीचा उत्सव. मात्र समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकांपर्यंत सणांचा आनंद पोहोचविणे हीदेखील समाजाची जबाबदारी आहे. याच सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत सिंहगड पत्रकार संघ व सिंहगड पत्रकार संघ डिजिटल मीडिया यांच्या वतीने खडकवासला, डोणजे आणि वरदाडे येथील आदिवासी कातकरी वाड्यांमध्ये दिवाळीनिमित्त फराळ व कपड्यांचे वाटप करण्यात आले. पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न मांडतानाच प्रत्यक्ष कृतीतून माणुसकी जपणाऱ्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे. दिवाळीच्या सणानिमित्त शहरात सर्वत्र रोषणाई, खरेदी आणि उत्साहाचे वातावरण असते. मात्र आर्थिक परिस्थितीमुळे अनेक आदिवासी कुटुंबांना सणाचा आनंद अपेक्षित पद्धतीने साजरा करता येत नाही. ही परिस्थिती लक्षात घेऊन पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी आदिवासी कातकरी वाड्यांना प्रत्यक्ष भेट देऊन तेथील कुटुंबीयांशी संवाद साधला. लहान मुलांना नवीन कपडे, तर कुटुंबीयांना दिवाळीचा फराळ भेट देण्यात आला. अचानक मिळालेल्या या भेटीमुळे लहान मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला, तर महिलांसह कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले.



सणांचा आनंद केवळ आपल्या कुटुंबापुरता मर्यादित न ठेवता समाजातील गरजू घटकांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश या उपक्रमामागे होता. आदिवासी बांधवांसोबत काही क्षण घालवून त्यांच्या आनंदात सहभागी होताना उपस्थित पत्रकारांनाही वेगळेच आत्मिक समाधान मिळाले. मदत ही केवळ वस्तूंच्या स्वरूपात नसून त्यामागील आपुलकी, जिव्हाळा आणि माणुसकीची भावना अधिक महत्त्वाची असते, याचा प्रत्यय या उपक्रमातून आला. पत्रकार हा समाजातील विविध घटकांचे प्रश्न मांडणारा महत्त्वाचा दुवा आहे. मात्र बातम्यांच्या माध्यमातून प्रश्न मांडण्याबरोबरच प्रत्यक्ष समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची गरज आहे. याच विचारातून सिंहगड पत्रकार संघाने सामाजिक उत्तरदायित्व जपत हा उपक्रम राबविला. समाजातील दुर्लक्षित घटकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या उपक्रमात सिंहगड पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष मिलिंद पानसरे, सिंहगड पत्रकार संघ डिजिटल मीडियाचे अध्यक्ष प्रकाश यादव, उपाध्यक्ष विशाल भालेराव व कैलास गायकवाड, डिजिटल मीडियाचे विशाल वाघमारे, सहस्त्र प्रोडक्शनचे राहुल व्यवहारे, रामचंद्र पोळेकर आणि परेश अंगणे सहभागी झाले होते. या उपक्रमाच्या नियोजनासाठी प्रकाश यादव व विशाल भालेराव यांनी विशेष मेहनत घेतली.

'गावगाथा'च्या एसटी बस लालपरी विशेषांकाचे उत्साहात प्रकाशन!

लालपरीच्या आठवणींना मिळाले शब्दरूप; वरिष्ठ आगार प्रमुख संजय वाळवे यांच्या हस्ते प्रकाशन सोहळा

पुणे (दै. आरंभ पर्व)

ग्रामीण भागापासून शहरापर्यंत लाखो प्रवाशांच्या जीवनाशी अतूट नाते निर्माण करणाऱ्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) लालपरीला समर्पित करण्यात आलेल्या 'गावगाथा दिवाळी अंक २०२६ – एसटी बस लालपरी विशेषांक'चे प्रकाशन रविवारी शिवाजीनगर बस स्थानकात उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. शिवाजीनगर बस स्थानकाचे वरिष्ठ आगार प्रमुख संजय वाळवे यांच्या हस्ते तसेच एसटी कर्मचारी आणि मान्यवरांच्या उपस्थितीत हा प्रकाशन सोहळा पार पडला.

यंदा 'गावगाथा' दिवाळी अंकाने एक आगळावेगळा विषय निवडत संपूर्ण अंक एसटीच्या लालपरीला समर्पित केला आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीचा अविभाज्य भाग बनलेल्या लालपरीने अनेक पिढ्यांच्या जीवनप्रवासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. विद्यार्थ्यांना शाळा - महाविद्यालयापर्यंत पोहोचविण्यापासून ते शेतकरी, नोकरदार, व्यापारी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य प्रवाशांच्या प्रवासापर्यंत एसटीने प्रत्येकाच्या आयुष्यात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. याच ऋणानुबंधांचा आणि आठवणींचा वेध या विशेषांकातून घेण्यात आला आहे.



या विशेषांकाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे लालपरीशी जोडलेल्या आठवणी, अनुभव आणि भावभावनांना दिलेले शब्दरूप. एसटीच्या प्रवासातून घडलेल्या आयुष्यातील महत्त्वपूर्ण घटना, बालपणीच्या आठवणी, गावाकडच्या प्रवासातील गंमतीजमती, चालक-वाहकांचे अनुभव आणि प्रवाशांच्या मनातील लालपरीविषयीचा जिव्हाळा विविध लेख, कथा आणि आठवणींच्या माध्यमातून मांडण्यात आला आहे.

एसटी महामंडळातील अधिकारी, कर्मचारी, साहित्यिक, लेखक तसेच सर्वसामान्य नागरिकांनी या विशेषांकासाठी आपले अनुभव आणि भावना व्यक्त केल्या आहेत. त्यामुळे हा अंक केवळ साहित्यिक दिवाळी अंक न राहता महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि ग्रामीण जीवनाचा दस्तऐवज ठरण्याच्या दिशेने वाटचाल करणारा आहे.

विशेष म्हणजे ज्या लालपरीने असंख्य प्रवाशांना त्यांच्या गावाशी, माणसांशी आणि स्वप्नांशी जोडले, त्याच एसटीच्या शिवाजीनगर बस स्थानकात या विशेषांकाचा प्रकाशन सोहळा पार पडला.

हा योगायोग या अंकाच्या संकल्पनेला अधिक अर्थपूर्ण करणारा ठरला. एसटी कर्मचारी आणि मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या प्रकाशन सोहळ्यामुळे लालपरीविषयीचा जिव्हाळा आणि आपुलकी पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

ग्रामीण साहित्याला व्यासपीठ देण्याचा 'गावगाथा'चा प्रयत्न

संपादक धोंडपा नंदे यांच्या संकल्पनेतून गेल्या पाच वर्षांपासून 'गावगाथा' दिवाळी अंक वेगवेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण विषय घेऊन वाचकांसमोर येत आहे. ग्रामीण भागातील नवोदित लेखक, साहित्यिक आणि आपल्या अनुभवांना शब्दरूप देणाऱ्या सामान्य माणसांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. 'आठवणीतील एसटी बस – लालपरी' या विषयाच्या माध्यमातून एका सार्वजनिक वाहतूक सेवेविषयीचे प्रेम, कृतज्ञता आणि पिढ्यान्पिढ्यांच्या आठवणी जतन करण्याचा अनोखा प्रयत्न यंदाच्या अंकातून करण्यात आला आहे. शिवाजीनगर बस स्थानकातील प्रकाशनामुळे या विशेषांकाच्या प्रवासाला एक संस्मरणीय सुरुवात झाली आहे.

दुष्काळाच्या सावटात कृषिमंत्र्यांची माणुसकीची दिवाळी

घोरपडवाडीत शेतकऱ्याच्या घरी फराळ



इंदापूर (दै. आरंभ पर्व)

दिवाळी म्हटले की रोषणाई, फटाक्यांची आतषबाजी आणि उत्साहाचा जल्लोष... मात्र यंदा अल निनोच्या संकटामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती आणि शेतीसमोरील आव्हाने लक्षात घेता, राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिवाळीचा सण अत्यंत साधेपणाने थेट बळीराजाच्या दारी जाऊन साजरा केला. इंदापूर तालुक्यातील घोरपडवाडी येथील सर्वसामान्य शेतकरी श्री. हनुमंत लावंड यांच्या घरी भेट देत त्यांनी शेतकरी कुटुंबासोबत दिवाळीचा आनंद साजरा केला. या उपक्रमातून शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याचा आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा संदेश त्यांनी दिला.

यंदा अल निनोच्या संभाव्य परिणामांमुळे राज्यातील अनेक भागांत दुष्काळाचे सावट निर्माण झाले असून, बळीराजा विविध संकटांचा सामना करीत आहे. पावसाची अनिश्चितता, पाण्याची टंचाई आणि शेतीच्या वाढत्या अडचणी यामुळे शेतकरी चिंतेत आहे. या परिस्थितीची जाणीव ठेवून शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी करण्याचा निर्णय घेतल्याचे कृषिमंत्री भरणे यांनी यावेळी सांगितले.

राज्य सरकारच्या वतीने शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्यात आली असून, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी केवळ तात्पुरत्या उपाययोजना न करता गावपातळीवर नियोजनबद्ध काम करण्याची गरज असल्याचे सांगत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी उपस्थित जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांना महत्त्वपूर्ण सूचना केल्या. इंदापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी आपण स्वतः, जिल्हा परिषदेचे सर्व सदस्य तसेच पंचायत समितीचे सदस्य यांच्या माध्यमातून आवश्यक ते सहकार्य केले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. पाण्याचे योग्य नियोजन करणे, उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने वापर करणे आणि शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मदत पोहोचविणे यावर विशेष भर देण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आठवणींनाही कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी उजाळा दिला. अजितदादांशिवाय दिवाळीची कल्पनाही करू शकत नाही. त्यांच्या अनुपस्थितीत साजरी होणारी ही पहिलीच दिवाळी असून, त्यांच्या आठवणी मनात कायम आहेत, अशा भावना व्यक्त करताना ते भावुक झाले. या भेटीदरम्यान कृषिमंत्री भरणे यांनी लावंड यांच्या शेतात फेरफटका मारत शेतीची पाहणी केली. तसेच गोठ्याला भेट देऊन जनावरांची माहिती जाणून घेतली. शेतकऱ्यांच्या विविध अडचणी, शेतीचे प्रश्न आणि ग्रामीण भागातील परिस्थिती याबाबत त्यांनी लावंड कुटुंबीयांशी मनमोकळा संवाद साधला.

थोडक्यात पण महत्वाचे



राष्ट्रीय कला अकादमीच्या दीपोत्सवात रंगांची उधळण

- मनमोहक रांगोळ्यांनी खुलविले सौंदर्य!
- 'दीपावली पाडवा दीपोत्सव २०२६' उत्साहात साजरा
- कला, संस्कृती आणि परंपरेचा सुंदर संगम

पुणे (आरंभ पर्व) : दीपावलीच्या मंगलमय पर्वाचे औचित्य साधून राष्ट्रीय कला अकादमी न्यास, पुणे यांच्या वतीने आयोजित 'दीपावली पाडवा दीपोत्सव २०२६' उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यानिमित्त साकारण्यात आलेल्या आकर्षक आणि कलात्मक रांगोळ्यांनी परिसराचे सौंदर्य खुलविले. विविध रंगांच्या सुरेख संगमातून साकारलेल्या रांगोळी कलाकृतींनी उपस्थितांची मने जिंकत दीपोत्सवाचे विशेष आकर्षण ठरल्या. या दीपोत्सवाला राष्ट्रीय कला अकादमी न्यासाचे संचालक, सहसंचालक, प्रशिक्षक आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच चतुःशृंगी देवस्थान ट्रस्टचे संचालक, लकडी पूल विठ्ठल मंदिराचे विश्वस्त दीपक थोरात, अखिल मंडई मंडळाचे विश्वस्त विश्वास भोर (काका) आणि देवीचे भाविक यांची विशेष उपस्थिती लाभली. दीपप्रज्वलन, विविध कलाविष्कार आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय आणि उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. रांगोळी कलाकारांनी आपल्या कल्पकतेतून आणि कौशल्यातून साकारलेल्या कलाकृतींनी भारतीय कला आणि परंपरेचे वैभव अधोरेखित केले. अकादमीचे पदाधिकारी, कलाकार आणि सभासद यांनी एकत्रित सहभाग नोंदवत कला, संस्कृती आणि परंपरेचा सुंदर आविष्कार घडविला. या अनोख्या दीपोत्सवामुळे दिवाळीचा आनंद द्विगुणित झाला असून, उपस्थितांनी या कलात्मक सोहळ्याचा मनमुराद आनंद घेतला.

जुन्नर नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना २० हजारांचे सानुग्रह अनुदान मंजूर!

- नगराध्यक्षा सुजाता काजळे व उपनगराध्यक्षा रुपाली परदेशी यांच्या प्रस्तावाला सभागृहाची मंजुरी
- कर्मचाऱ्यांकडून पदाधिकाऱ्यांचा सत्कार

जुन्नर (आरंभ पर्व) : जुन्नर नगरपरिषदेच्या सभेदरम्यान नगरपरिषदेतील सर्व कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. नगराध्यक्षा सुजाता मधुकर काजळे व उपनगराध्यक्षा रुपालीताई आकाश परदेशी यांनी नगरपालिका कर्मचाऱ्यांना प्रत्येकी ३० हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्यात यावे, अशी सूचना सभागृहात मांडली. या सूचनेनंतर झालेल्या चर्चेत संपूर्ण सभागृहाने कर्मचाऱ्यांना प्रत्येकी २० हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्यास मंजुरी दिली. या निर्णयामुळे नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या निर्णयाबद्दल नगरपरिषदेतील सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने नगराध्यक्षा सुजाता मधुकर काजळे, उपनगराध्यक्षा रुपालीताई आकाश परदेशी, मुख्याधिकारी चरणजी कोल्हे आणि लेखा विभाग प्रमुख सईद सर यांचा सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले. तसेच या निर्णयाला सहकार्य करून मंजुरी देणाऱ्या सर्व नगरसेवकांचेही कर्मचाऱ्यांनी आभार मानले. नगरपरिषदेच्या कामकाजात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान मंजूर झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

२३२ व्या जयंतीनिमित्त व्याख्यान व विशेष कार्यक्रमाचे आयोजन!

बारामती (आरंभ पर्व) : आद्य क्रांतिकारक लहुजी वस्ताद साळवे यांच्या २३२ व्या जयंती महोत्सवानिमित्त सकल हिंदू समाज, बारामती यांच्या वतीने शनिवार, दि. १४ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजता विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून प्रा. निखिल तांबे सर (इतिहास अभ्यासक) उपस्थित राहणार असून, सत्कारमूर्ती म्हणून लखन जाधव (प्राचार्य, सर्वसमावेशक गुरुकुलम् व शिवकालीन युद्धकला प्रशिक्षक) यांचा सन्मान करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रविराज वसंत गंगावणे (अध्यक्ष, वसंतमामा बहुउद्देशीय संस्था, जोशी समाज) भूषविणार आहेत. लहुजी वस्ताद साळवे यांचे शौर्य, देशभक्ती, क्रांतिकारी विचार आणि समाजप्रबोधनातील योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम पुण्यश्लोक अहिल्यादेवी भवन, बोबडे हॉस्पिटलशेजारी, हरिकृपानगर, बारामती येथे होणार आहे. या जयंती महोत्सवासाठी नागरिक, युवक, सामाजिक कार्यकर्ते आणि इतिहासप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सकल हिंदू समाज, बारामती यांच्या वतीने करण्यात आले आहे.

वैरागच्या प्रलंबित प्रश्नांसाठी पाडव्याच्या दिवशीच आमरण उपोषण सुरू!

वैराग (दै. आरंभ पर्व)

दिवाळी पाडव्याच्या सणादिवशीच वैरागच्या प्रलंबित प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष समाधान (रविंद्र) सुभाष पवार यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. १० नोव्हेंबरपासून वैराग येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक, नाका क्रमांक ३ येथे त्यांनी आंदोलनाला सुरुवात केली आहे. वैराग परिसरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांकडे शासन आणि प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी पवार यांनी हे आंदोलन सुरू केले आहे. वैराग येथील बंद पडलेला श्री संतनाथ (भोगावती) सहकारी साखर कारखाना पुन्हा सुरू करावा, वैरागला स्वतंत्र तालुक्याचा दर्जा द्यावा, अपर तहसील कार्यालय



सुरू करावे, तसेच ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाची मुख्य इमारत आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने उभारावीत, अशा चार प्रमुख मागण्या त्यांनी केल्या आहेत. या मागण्यांसंदर्भात पवार यांनी १४ ऑक्टोबर रोजी सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले होते. मागण्यांवर ठोस कार्यवाही न झाल्यास आमरण उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला होता. मात्र, अद्याप प्रश्न मार्गी न लागल्याने अखेर त्यांनी दिवाळी पाडव्याच्या दिवशीच उपोषणाचे हत्यार उपसले.

दरम्यान, उपोषणस्थळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस प्रमोद सुरेश कापसे, बार्शी तालुकाध्यक्ष बापू चौबे यांच्यासह तालुक्यातील विविध पदाधिकारी आणि वैराग परिसरातील नागरिकांनी भेट देऊन आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. या आंदोलनाबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूलमंत्री, सहकारमंत्री तसेच संबंधित राज्यमंत्री यांच्यासह बार्शीचे तहसीलदार, सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक आणि संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना निवेदनाच्या प्रती पाठविण्यात आल्या आहेत.

साखर कारखान्याचा प्रश्न, स्वतंत्र तालुक्याची मागणी, महसूल कार्यालयाची सुविधा आणि ग्रामीण रुग्णालयाची इमारत हे वैरागच्या विकासाशी निगडित महत्त्वाचे विषय आहेत. या मागण्यांसाठी पाडव्याच्या दिवशी सुरू झालेले समाधान पवार यांचे आमरण उपोषण किती दिवस चालणार आणि प्रशासन यावर काय भूमिका घेणार, याकडे आता वैरागकरांचे लक्ष लागले आहे.

हिरो मोटोकॉर्पची 'एक्स्ट्रीम १२५आर स्टील्थ एडिशन' बाजारात दाखल

पुणे (दै. आरंभ पर्व)



दुचाकी वाहन क्षेत्रातील आघाडीची कंपनी हिरो मोटोकॉर्पने आपल्या लोकप्रिय एक्स्ट्रीम १२५आर मोटरसायकलचे नवीन 'स्टील्थ एडिशन विथ टीएफटी' बाजारात दाखल केले आहे.

स्पोर्टी १२५ सीसी मोटरसायकल श्रेणीतील आपले स्थान अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने कंपनीने या नवीन मॉडेलमध्ये आधुनिक तंत्रज्ञान, स्मार्ट कनेक्टिव्हिटी आणि प्रगत सुरक्षा वैशिष्ट्यांचा समावेश केला आहे. नव्या पिढीतील तरुण रायडर्सच्या अपेक्षा लक्षात घेऊन या मोटरसायकलची निर्मिती करण्यात आली आहे. या लाँचप्रसंगी हिरो मोटोकॉर्पच्या इंडिया बिझनेस युनिटचे मुख्य व्यवसाय अधिकारी आशुतोष वर्मा म्हणाले की, स्पोर्टी १२५ सीसी मोटरसायकल श्रेणी वेगाने विकसित होत असून तरुण ग्राहकांना आकर्षक डिझाइनसोबतच आधुनिक तंत्रज्ञान आणि सुरक्षिततेचीही अपेक्षा आहे. एक्स्ट्रीम १२५आरच्या नवीन स्टील्थ एडिशनमधून प्रगत कनेक्टिव्हिटी आणि सुरक्षा वैशिष्ट्ये अधिक ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे.

भाऊबीजेची भावनिक भेट

जुन्नर (दै. आरंभ पर्व)

दिवाळीतील भाऊबीज म्हणजे फक्त एक सण नाही, तर बहीण-भावाच्या अतूट नात्याचा आणि जबाबदारीचा उत्सव! पुणे, भोसरी, नाशिक आणि मुंबई अशा चार वेगवेगळ्या शहरांत विखुरलेल्या आपल्या चारही बहिणींच्या घरी अचानक पोहोचून भावाने या नात्याची साक्ष दिली. यामुळे अंतर कितीही असले, तरी बहिण भावाच्या जिव्हाळा, प्रेमाच्या वाटा कधीच लांब नसतात याची प्रचिती आली. भोसरी-पुणे येथील पताशीबाई रतनचंद मानव कल्याण ट्रस्ट अंधशाळा तथा पुणे जिल्हा परिषदेतील दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय येथील सामाजिक कार्यकर्ते जुन्नर येथील संभाजी साखरलाल भांगरे ह्या भावाने भाऊबीजेच्या दिवशी आपल्या चारही बहिणींनी नात्याची साक्ष दिली. दाराची बेल वाजली आणि समोर उभा असलेला भाऊ पाहून बहिणींना क्षणभर डोळ्यांवर विश्वासच बसला नाही. ह्या सुखद धक्क्याने बहिणीच्या चेहऱ्यावरचा क्षणिक आश्चर्याचा धक्का क्षणात आनंद अश्रूंमध्ये बदलला. "आई-



वडिलानंतर माझा भाऊ आमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे," ही भावना बहिणींच्या डोळ्यात दिसल्याचे भांगरे म्हणाले॥ भावाच्या चेहऱ्यावर बहिणींच्या सुरक्षेची आणि प्रेमाची काळजी स्पष्ट दिसत होती, तर बहिणींच्या मनात भावाबद्दलचा अभिमान दाटून आला होता.

ओवाळणीच्या त्या ताटात फक्त ओवाळणे नव्हते, तर संपूर्ण कुटुंबाच्या प्रेमाची आणि विश्वासाची ऊब होती! भांगरे यांची मुंबई येथील संगीता रमेश बटवाल, पुणे येथील वैशाली सुनिल विधाटे, भोसरी येथील रुपाली संदीप कानडे व नाशिक येथील माधुरी किरण जंजाळे ह्या सर्व गृहिणी असलेल्या बहिणींना भाऊ संभाजी यांनी भाऊबीजेच्या निमित्ताने एकाच दिवशी दिलेली भेट ही बहिणींनी आनंदाची पर्वणी ठरली.

चिमुकल्यांनी साकारले ऐतिहासिक किल्ले

रायसोनी स्कूलमध्ये शिवकालीन वारशाचा जागर!

किल्ले बनवा स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग; मुरुड-जंजिरा समूहाचा प्रथम क्रमांक

पुणे (दै. आरंभ पर्व)

दिवाळीच्या पारंपरिक उत्साहाला महाराष्ट्राच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाची जोड देत वाघोली येथील जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये आंतरगट किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी माती, दगड, गवत, काड्या आणि पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्ल्यांच्या आकर्षक प्रतिकृती साकारल्या. चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या कल्पकतेतून उभ्या राहिलेल्या या किल्ल्यांमुळे शाळेच्या परिसरात शिवकालीन इतिहासाचा जिवंत देखावा पाहायला मिळाला. विद्यार्थ्यांनी रायगड, सिंहगड, प्रतापगड आणि शिवनेरी यांसारख्या ऐतिहासिक किल्ल्यांच्या प्रतिकृती



अत्यंत मेहनतीने तयार केल्या. किल्ल्यांवरील बुरूज, प्रवेशद्वारे, खंदक, भगवे ध्वज तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि मावळ्यांच्या प्रतिकृतींनी या कलाकृतींना विशेष आकर्षक स्वरूप प्राप्त झाले होते. किल्ल्यांची उभारणी करताना विद्यार्थ्यांनी त्यांच्या ऐतिहासिक महत्त्वाचाही अभ्यास केला. स्पर्धेचे परीक्षण सर्जनशीलता, ऐतिहासिक अचूकता, नीटनेटकेपणा, पर्यावरणपूरक साहित्याचा वापर आणि सांघिक कार्य या निकषांवर करण्यात आले. या स्पर्धेत मुरुड-जंजिरा समूहाने प्रथम क्रमांक, तर शिवराय रायगड समूहाने द्वितीय क्रमांक पटकावला. अथर्व भुरे आणि अवनी भुरे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्राचार्य अजय लांडगे म्हणाले, "किल्ले म्हणजे केवळ दगड-मातीची रचना नसून ते आपल्या शौर्याची, पराक्रमाची आणि स्वाभिमानाची गौरवगाथा आहेत. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी किल्ले साकारल्यामुळे त्यांना इतिहासाची ओळख अधिक प्रभावीपणे होते. अशा उपक्रमांतून नव्या पिढीमध्ये ऐतिहासिक वारशाविषयी अभिमान आणि आदर निर्माण होतो." या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि कलागुणांना वाव मिळण्यासोबतच त्यांच्यामध्ये सांघिक भावना, संयम, कल्पकता आणि ऐतिहासिक वारशाचे जतन करण्याची जाणीव निर्माण झाली. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या आकर्षक किल्ल्यांचे शिक्षक आणि पालकांनी विशेष कौतुक केले. पारितोषिक वितरण समारंभाने कार्यक्रमाची उत्साहपूर्ण सांगता झाली.

शिववंदना ग्रुपचा तृतीय वर्धापन दिन उत्साहात साजरा

- तीन वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण
- चौथ्या वर्षात सामाजिक, धार्मिक आणि सेवाभावी उपक्रमांचा विस्तार करण्याचा संकल्प

पुणे (दै. आरंभ पर्व)

भक्ती, श्रद्धा, संस्कार आणि समाजसेवेचा ध्यास घेऊन सुरू झालेल्या शिववंदना ग्रुपने तीन वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण करत चौथ्या वर्षात दिमाखदार पदार्पण केले आहे. १४ नोव्हेंबर २०२३ रोजी दीपावली पाडव्याच्या शुभमुहूर्तावर स्थापन झालेल्या या ग्रुपने गेल्या तीन वर्षांत धार्मिक उपक्रमांसोबत सामाजिक बांधिलकी जपत विविध क्षेत्रांत आपले योगदान दिले आहे.

या प्रवासात अनेक अडचणी, आव्हाने आणि चढ-उतार आले; मात्र छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार, छत्रपती संभाजी महाराजांचा त्याग आणि शिवभक्तांची एकजूट या प्रेरणेतून ग्रुपने आपली वाटचाल सातत्याने सुरू ठेवली. साप्ताहिक शिववंदनेच्या माध्यमातून भक्ती, अध्यात्म, संस्कार आणि सामाजिक एकतेचा विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्यही ग्रुपकडून केले जात आहे. शिववंदना ग्रुपच्या माध्यमातून रामनवमी उत्सव, विविध धार्मिक कार्यक्रम आणि हिंदू संस्कृती व परंपरांचे जतन करण्यासाठी उपक्रम राबविले जातात. त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक वारशाचे जतन, गड-किल्ल्यांचे संवर्धन आणि नव्या पिढीमध्ये इतिहासाविषयी आवड निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. सामाजिक बांधिलकी जपत आरोग्य शिबिरांचे आयोजन, गरजू नागरिकांना अल्पदरात वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे, तसेच पशुकल्याणाच्या क्षेत्रात जखमी व निराधार प्राण्यांना मदत करणे, गोमाता संवर्धन आणि गोसेवेचे उपक्रमही ग्रुपच्या कार्याचा महत्त्वाचा भाग आहेत.



चौथ्या वर्षात व्यापक कार्याचा संकल्प

तीन वर्षांच्या अनुभवातून प्रेरणा घेत चौथ्या वर्षात सामाजिक, धार्मिक, आरोग्य सेवा, गड-किल्ले संवर्धन आणि पशुकल्याण अशा विविध क्षेत्रांत अधिक नियोजनबद्ध आणि व्यापक स्वरूपात कार्य करण्याचा संकल्प शिववंदना ग्रुपने केला आहे. केवळ कार्यक्रमांचे आयोजन न करता समाजात सकारात्मक बदल घडवणे, गरजूंच्या मदतीला धावून जाणे, ऐतिहासिक वारसा जपणे आणि प्रत्येकाच्या मनात सेवाभाव निर्माण करणे हेच ग्रुपचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे संस्थापकांनी सांगितले.

यावेळी शिववंदना ग्रुपचे संस्थापक गणेश पाटील, निलेश काळे, अक्षय हळंदे, विजय हारेकर, दीपक मुकनाथ, अजिंक्य जाधव, अक्षय मांजरेकर, दीपक सुरवसे, मंथन तांबे, सचिन मामा चव्हाण, गणेश सूनके, ओंकार तेली, संग्राम कदम, मनोज झगडे, अनिकेत गायकवाड, आकाश गायकवाड, अपूर्वा भुवड, समृद्धी साळुंखे, सौ. रसिका मुकनाथ यांच्यासह ग्रुपचे इतर सदस्य उपस्थित होते.

भक्ती, इतिहास आणि समाजसेवेचा वारसा जपत शिववंदना ग्रुपची चौथ्या वर्षाकडे वाटचाल सुरू झाली असून, आगामी काळात अधिक व्यापक सेवाकार्य उभे करण्याचा निर्धार सदस्यांनी व्यक्त केला.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

थोडक्यात पण महत्वाचे

नेत्यावरील प्रेम आणि निष्ठेचा अनोखा आविष्कार!



- स्वतःच्या रक्ताने साकारले सागर भिसे यांचे छायाचित्र
- बबन सोनवणे यांची अनोखी दिवाळी भेट चर्चेत!

बारामती-केदार पाटोळे (दै. आरंभ पर्व) : एखाद्या नेत्यावर किती प्रेम, निष्ठा आणि आदर असावा, याचे अनोखे उदाहरण पाडव्याच्या निमित्ताने पाहायला मिळाले. कार्यकर्ते पै.बबन सोनवणे यांनी दिवाळी पाडव्याच्या शुभेच्छा देण्यासाठी श्री. सागर भिसे यांचे छायाचित्र स्वतःच्या रक्ताने रेखाटून त्यांना सप्रेम भेट दिले. त्यांच्या या अनोख्या भेटीची परिसरात विशेष चर्चा रंगली आहे. दिवाळीच्या सणानिमित्त अनेकजण आपल्या नेत्यांना पुष्पगुच्छ, मिठाई आणि भेटवस्तू देऊन शुभेच्छा देतात. मात्र, बबन सोनवणे यांनी त्यापेक्षा वेगळी वाट निवडत स्वतःच्या रक्ताने साकारलेले सागर भिसे यांचा हुबेहूब छायाचित्र भेट देऊन आपल्या भावना व्यक्त केल्या. ही केवळ एक कलाकृती नसून आपल्या नेत्याविषयी असलेला आदर, जिव्हाळा आणि भावनिक नात्याचे प्रतीक असल्याची भावना व्यक्त होत आहे. पैशाने प्रत्येक भेटवस्तू विकत घेता येते; मात्र त्यामागील भावना आणि समर्पणाची किंमत पैशांत मोजता येत नाही, हे पै.बबन सोनवणे यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. त्यांच्या या अनोख्या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, नेत्यावरील प्रेम व्यक्त करण्याची ही अनोखी पद्धत चर्चेचा विषय ठरली आहे. पाडव्याच्या शुभमुहूर्तावर दिलेली ही अनोखी भेट निश्चितच अविस्मरणीय ठरणार आहे.



महिला पोलिसांना भेटवस्तू - स्वान फाऊंडेशनचा ६ व्या वर्षीही उपक्रम

पुणे (दै. आरंभ पर्व) : दिवाळी आणि भाऊबीज निमित्त पुणे शहरातील महिला पोलिसांना स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशनच्या वतीने गेली ६ वर्षे भेटवस्तू देण्यात येत आहेत. यावर्षी पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील महिला पोलिसांना भेटवस्तू देण्यात आल्या. यावेळी अतिरिक्त पोलीस आयुक्त तेजस्वी सातपुते, उपायुक्त गोहर हसन (IPS), शंकर ककडे, प्रसिद्ध उद्योगपती पंकज डहाणूकर, डॉ. इफ्तार पठाण, स्वान फाऊंडेशनचे अध्यक्ष शशिकांत कांबळे, अभिजित मोडक उपस्थित होते. यावेळी बोलताना अतिरिक्त पोलीस आयुक्त तेजस्वी सातपुते म्हणाल्या, "स्वान फाऊंडेशन आणि शशिकांत कांबळे हे गेली ६ वर्षे महिला पोलिसांसाठी भाऊबीज निमित्त हा कार्यक्रम करत आहेत.मी ज्या ज्या ठिकाणी होते तिथे म्हणजेच सातारा, सोलापूर, मुंबई आणि आता पुणे या ठिकाणी हा उपक्रम राबविण्यात आला आहे.सणासुदीला कुटुंबापासून दूर राहून कर्तव्य बजावणाऱ्या महिला पोलिसांसाठी हा भाऊबीजेचा आनंद खूप मोठा आहे. यावेळी स्वान फाऊंडेशनचे अध्यक्ष शशिकांत कांबळे म्हणाले, "आमच्यासाठी हा कार्यक्रम नाही, हे आमचं कर्तव्य आहे. ज्या महिला पोलीस दिवाळीत आपल्या मुलांना सोडून आपल्यासाठी ड्युटी करतात, त्यांना एका भावाने भाऊबीजेला आठवण करून देणं, हेच खरं नातं आहे. जोपर्यंत स्वान फाऊंडेशन आहे, तोपर्यंत हा उपक्रम कधीच थांबणार नाही."

जुन्या वादातून तरुणावर टोळक्याचा प्राणघातक चाकूहल्ला

उल्हासनगर (दै. आरंभ पर्व) : जुन्या भांडणाचा राग मनात धरून सात ते आठ जणांच्या टोळक्याने एका तरुणावर हल्ला केल्याची घटना बालकनजी बारी परिसरात घडली आहे. या हल्ल्यात शंकर रतन कांबळे हा तरुण गंभीर जखमी झाला असून, त्याच्या पोटात चाकू खुपसण्यात आला आहे. याप्रकरणी मध्यवर्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास फिर्यादी दीपक फतपुरे हा त्याचे मित्र शंकर कांबळे आणि दिनेश अहिरे यांच्यासोबत गरीबनगर परिसरात उभा होता. यावेळी आदित्य गायकवाड, ऋषिकेश आरके, सुमित सुरडकर आणि त्यांच्यासोबत असलेले चार ते पाच अनोळखी तरुण तेथे आले. नेहरू चौकात यापूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या मित्रांना शिवीगाळ करत हाताने व ठोशाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. दरम्यान, आदित्य गायकवाड याने स्वतःजवळील चाकू काढून शंकर कांबळे याच्या पोटाच्या उजव्या बाजूला वार केला. या हल्ल्यात शंकर गंभीर जखमी झाला. घटनेनंतर आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला. जखमी शंकरवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी मध्यवर्ती पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांसह महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सुमित कैलास सुरडकर याला अटक केली असून, आदित्य गायकवाड, ऋषिकेश आरके यांच्यासह अन्य चार ते पाच आरोपींचा शोध सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रवीण खंदारे करीत आहेत. अटक आरोपी सुमित सुरडकर याला न्यायालयात हजर केले असता, त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.




सरपंच सूरज चौधरी यांच्याकडून पत्रकारांचा सन्मान

- दिवाळीनिमित्त स्नेहमेळाव्याचे आयोजन
- पत्रकारांशी साधला संवाद; सामाजिक, राजकीय आणि स्थानिक विकासाच्या प्रश्नांवर विचारांची देवाणघेवाण



लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)

दिवाळी सणाचे औचित्य साधून पेठ गावचे सरपंच सूरज भालचंद्र चौधरी यांच्या वतीने पत्रकार बांधवांसाठी विशेष स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले. पत्रकारांचा सन्मान करण्यासोबतच त्यांच्याशी संवाद साधणे, परस्परांमधील स्नेहभाव वाढवणे आणि दिवाळीचा आनंद एकत्रितपणे साजरा करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. दिवाळी हा सण केवळ दिव्यांचा आणि रोषणाईचा नसून नाती जपण्याचा, आपुलकी वाढवण्याचा आणि आनंद वाटून घेण्याचा उत्सव आहे. याच भावनेतून सूरज चौधरी यांनी पत्रकारांसाठी या स्नेहभेटीचे आयोजन केले होते. या वेळी उपस्थित पत्रकारांशी सामाजिक, राजकीय तसेच स्थानिक विकासाच्या विविध विषयांवर अनौपचारिक चर्चा करण्यात आली. ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या, विकासकामे, पत्रकारिता क्षेत्रातील आव्हाने आणि लोकशाही व्यवस्थेत पत्रकारांची भूमिका अशा विविध विषयांवर विचारांची देवाणघेवाण झाली. पत्रकार हा समाजातील सामान्य नागरिकांचा आवाज असून, प्रशासन आणि जनता यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून तो काम करतो. ग्रामीण भागातील समस्या, नागरिकांच्या अडचणी आणि विकासाचे प्रश्न समाजासमोर मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार करतात. त्यांच्या कार्याचा सन्मान व्हावा आणि त्यांच्याशी स्नेहाचे नाते अधिक दृढ व्हावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे सूरज चौधरी यांनी सांगितले. या स्नेहमेळाव्यामुळे उपस्थित पत्रकारांमध्ये आनंदाचे आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले. केवळ औपचारिक शुभेच्छांपुरता मर्यादित न राहता संवाद, विचारांची देवाणघेवाण आणि परस्परांतील संबंध दृढ करणारा हा उपक्रम ठरला. सूरज चौधरी यांच्या या पुढाकाराचे उपस्थितांनी कौतुक केले. यावेळी कोरेगाव मूळचे माजी उपसरपंच लोकेश कानकाटे, सोरतापवाडी व पेठचे पोलीस पाटील दत्तात्रय चौधरी, पत्रकार सचिन सुंबे, शरद पुजारी, अमोल भोसले, सुवर्णाताई कांचन, चंद्रकांत दुंडे, अमोल आढागळे, बापू धुमाळ, बापूसाहेब चौधरी, भाऊसाहेब महाडिक, सुभाष कड, गजानन जगताप, दिनेश कदम, अमोल महाडिक आदी उपस्थित होते.



पुण्यात 'राजर्षी शिवछत्रपती स्फूर्ती गाथा' सोहळ्याचे आयोजन !

- स्वामी गोविंदगिरीजी महाराज यांच्या अमृतवाणीतून शिवचरित्राचा होणार जागर
- १३ ते १५ रोजी पार पडणार सोहळा

पुणे (दै. आरंभ पर्व)

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रेरणादायी जीवनचरित्र, अद्वितीय पराक्रम, राष्ट्रनिष्ठा आणि स्वराज्य स्थापनेचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने पुण्यात भव्य 'राजर्षी शिवछत्रपती स्फूर्ती गाथा' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. माहेश्वरी परिवार फाउंडेशन आणि समस्त माहेश्वरी समाज, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने १३ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत महालक्ष्मी लॉन्स, डी.पी. रोड, पुणे येथे हा तीन दिवसीय सोहळा रंगणार आहे. अयोध्येतील प्रभू श्री राम मंदिराचे महासचिव परमपूज्य स्वामी गोविंदगिरीजी महाराज यांच्या ओजस्वी आणि अमृतमय वाणीतून छत्रपती शिवाजी महाराजांचे गौरवशाली जीवनचरित्र उलगडले जाणार आहे. शिवरायांचे विचार, असामान्य नेतृत्व, स्वराज्य स्थापनेचा संघर्ष आणि राष्ट्रनिर्माणाचे कार्य यांचा घालवलेले आनंदाचे क्षण, शालेय जीवनातील अनुभव आणि जीवनात मिळवलेले यश याविषयी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी जुन्या आठवणींना उजाळा देताना अनेकांच्या चेहऱ्यावर आनंद आणि भावूकपणा दिसून येत होता. केवळ आठवणींमध्ये रमण्यापुरता हा मेळावा मर्यादित न राहता शाळेच्या उज्ज्वल भविष्यासाठी योगदान देण्याचा संकल्पही माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा उपयोग शाळेच्या शैक्षणिक प्रगतीसाठी करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांकडून शाळेला शिष्यवृत्ती परीक्षेची पुस्तके, अवांतर वाचनाची पुस्तके, इलेक्ट्रिकल साहित्य तसेच विद्यार्थ्यांसाठी बक्षिसे भेट देण्यात आली. यावेळी दिवाळीच्या सुट्टीत आयोजित करण्यात आलेल्या किल्ले स्पर्धेतील विजेत्यांना तसेच कब-बुलबुल उपक्रमातील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने 'आयडॉल शिक्षक' म्हणून निवड झाल्याबद्दल श्री. अनिल गळंगे सर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात माजी विद्यार्थी प्रिया वाघमारे, सागर ढगारे, राजेंद्र कोकरे, मारुती कोकरे, स्वाती वाघमारे आणि अलका वाशिलकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शाळेने दिलेले संस्कार, शिक्षकांनी केलेले मार्गदर्शन आणि शाळेशी असलेले ऋणानुबंध याविषयी त्यांनी भावना व्यक्त केल्या. तसेच शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी भविष्यातही सहकार्य करण्याची ग्वाही दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. रुपाली गळंगे यांनी केले, तर अलका वाशिलकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. या मेळाव्याचे आयोजन शाळा व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी संघ, माता पालक संघ आणि ग्रामपंचायत बहिरवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. सागर ढगारे, राजेंद्र कोकरे, किरण चिव्हे, संतोष कोकरे, मारुती कोकरे, विजय जानकर, दत्तात्रय जानकर, सुभाष भगत, तुषार भगत, राजू भगत, शंकर भगत, कारकूडदादा, बनूबाई ढगारे, सुनीता ढगारे, स्वाती वाघमारे, संगिता ढगारे यांच्यासह माजी विद्यार्थी, ग्रामस्थ आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्या शाळेने आपल्याला घडवले, त्या शाळेचे ऋण फेडण्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत दिलेले योगदान हा या मेळाव्याचा विशेष ठरला. जुन्या आठवणींना उजाळा देतानाच शाळेच्या प्रगतीसाठी हातभार लावण्याचा प्रेरणादायी संदेश या स्नेहमेळाव्यातून देण्यात आला.

बहिरवाडी शाळेत माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

गुरुजनांच्या आठवणींना उजाळा; शाळेच्या विकासासाठी माजी विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक साहित्याची भेट



नारायणपूर (अमित सांबरे) (दै. आरंभ पर्व)

बहिरवाडी (ता. पुरंदर) : पुणे जिल्हा परिषद, पुणे अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बहिरवाडी, केंद्र काळदरी येथे मंगळवार, दि. १० नोव्हेंबर २०२६ रोजी दिवाळी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर माजी विद्यार्थी मेळाव्याचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या मेळाव्याच्या निमित्ताने शाळेतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेले आणि आज विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले माजी विद्यार्थी अनेक वर्षांनंतर एकत्र आले. यामुळे शाळेचा परिसर जुन्या आठवणींनी आणि स्नेहभावनेने भारावून गेला होता. या मेळाव्यात माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. शाळेतील गुरुजनांचे मार्गदर्शन, मित्र-मैत्रिणींसोबत

२२ नोव्हेंबरला आंतरराष्ट्रीय दौंड रायझिंग हाफ मॅरेथॉन भव्य स्पर्धा



दौंड (दै. आरंभ पर्व)

क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि नागरिकांमध्ये आरोग्य व फिटनेसविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात येणारी 'दौंड रायझिंग हाफ मॅरेथॉन २०२६' ही भव्य स्पर्धा रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी दौंड येथे उत्साहात पार पडणार आहे. तालुका क्रीडा संकुल, दौंड येथून पहाटे ५.३० वाजता या मॅरेथॉनला प्रारंभ होणार असून, यंदाही मोठ्या संख्येने धावपटू सहभागी होणार आहे. या स्पर्धेचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ही केवळ धावपटूंसाठीची स्पर्धा नसून संपूर्ण कुटुंबाला सहभागी होता येणारा एक आनंददायी क्रीडा महोत्सव आहे. स्पर्धेमध्ये २१ किलोमीटर, १० किलोमीटर, ५ किलोमीटर आणि ३ किलोमीटर अशा चार गटांचा समावेश करण्यात आला आहे. विशेष म्हणजे चार वर्षांच्या लहान मुलांपासून ते ९० वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटांतील व्यक्तींना या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे.

या मॅरेथॉनविषयी माहिती देताना डॉ. रोहन खवटे यांनी नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, मॅरेथॉनचे वैशिष्ट्य म्हणजे येथे केवळ वेगाने धावणारा व्यक्तीच विजेता नसतो, तर स्वतःच्या क्षमतेनुसार सहभागी होणारे लहान बालक, तरुण, महिला, ज्येष्ठ नागरिक असे प्रत्येक जण विजेता असतो. ज्यांना धावता येत नाही त्यांनी चालत सहभागी व्हावे. त्यामुळे 'मला धावता येत नाही' असा न्यूनगंड कोणीही बाळगू नये. आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांनी या स्पर्धेत आवर्जून सहभाग नोंदवावा. तसेच मित्रपरिवार, शाळा, महाविद्यालये आणि विविध संस्थांनीही जास्तीत जास्त सहभागासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

दौंड रायझिंग हाफ मॅरेथॉनचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या स्पर्धेचा मार्ग AIMS या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या मानांकनाशी संबंधित आहे. या मानांकनामुळे स्पर्धेला आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. स्पर्धेत सहभागी धावपटूंना मिळणारे अधिकृत वेळेचे प्रमाणपत्र आणि टायमिंग रेकॉर्ड भविष्यात इतर मोठ्या मॅरेथॉन स्पर्धांसाठी उपयुक्त ठरू शकतात.

या मॅरेथॉनचा मार्ग तालुका क्रीडा संकुल, दौंड येथून सुरू होणार आहे. शहरातील विविध भागांतून, बोरावकेनगर आणि एसआरपी परिसरातून पुढे कुरकुंभ घाट, देवी फिरंगाई मंदिर तसेच कुरकुंभ पोलीस चौकीपर्यंत हा मार्ग जाणार आहे. तेथून पुन्हा त्याच मार्गाने परत येत २१ किलोमीटरचे अंतर पूर्ण केले जाणार आहे. हा मार्ग आंतरराष्ट्रीय मानांकनाच्या दृष्टीने निश्चित करण्यात आल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

यंदाच्या स्पर्धेचे आणखी एक आकर्षण म्हणजे विजेत्यांसाठी तब्बल चार लाख रुपयांची रोख पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. त्यामुळे हौशी धावपटूंसह अनुभवी आणि स्पर्धात्मक धावपटूंनाही आपले कौशल्य दाखविण्याची मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

या स्पर्धेसाठी ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून, मोबाईलवर उपलब्ध असलेल्या नोंदणी लिंकद्वारे किंवा QR कोड स्कॅन करून सहभागी होता येणार आहे. तसेच अधिकृत वेबसाईटवरूनही नोंदणी करता येणार आहे. नोंदणीची अंतिम तारीख १५ नोव्हेंबर २०२६ असल्याने इच्छुकांनी अंतिम तारखेची वाट न पाहता लवकरात लवकर आपली नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन डॉ रोहन खवटे व डॉ. राजेश दाते यांनी केले आहे. चला तर मग, दौंडकरांनो! २२ नोव्हेंबर रोजी धावण्यासाठी सज्ज व्हा आणि 'दौंड रायझिंग हाफ मॅरेथॉन २०२६' मध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन निरोगी दौंडचा संकल्प करूया

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाच्या

सुधारित अभ्यासक्रमावर आधारित पाच पुस्तकांचे प्रकाशन

- जयहिंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राध्यापकांची उल्लेखनीय कामगिरी
- संस्थेच्या वतीने लेखकांचा विशेष सन्मान

नारायणगाव (दै. आरंभ पर्व)

औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) क्षेत्रातील विद्यार्थ्यांना अद्ययावत आणि दर्जेदार शैक्षणिक ज्ञान उपलब्ध व्हावे, तसेच बदलत्या शैक्षणिक गरजांनुसार त्यांची गुणवत्ता आणि कौशल्ये विकसित व्हावीत, या उद्देशाने फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (PCI) च्या सुधारित मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) वर आधारित पाच नवीन पाठ्यपुस्तकांचा प्रकाशन सोहळा जयहिंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे उत्साहात संपन्न झाला. या प्रकाशन सोहळ्यास जयहिंद शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष जितेंद्र गुंजाळ, डॉ. शुभांगी गुंजाळ, पुणे येथील प्रसिद्ध वक्ते डॉ. प्रवीण बुगे, इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. अमोल उबाळे, प्रा. सुभाष आंद्रे, प्रा. राजकुमार मानकर यांच्यासह प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जयहिंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राध्यापकांनी एकूण पाच शैक्षणिक पुस्तकांचे लेखन केले असून, बी. फार्मसीच्या सुधारित अभ्यासक्रमानुसार ही पुस्तके अत्यंत सोप्या व विद्यार्थ्यांना सहज समजतील अशा भाषेत तयार करण्यात आली आहेत. यामध्ये 'जनरल फार्मसी' या पुस्तकाचे लेखन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तेजस शिवराम पाचपुते यांनी केले आहे. 'फार्मास्युटिकल इनऑरगॅनिक अँड ॲनालिटिकल केमिस्ट्री' या पुस्तकाचे लेखक डॉ. अण्णासाहेब गायकवाड आहेत. 'लॅब मॅन्युअल ऑफ इंट्रोडक्शन टू फार्माकोग्नोसी' या पुस्तकाच्या लेखिका प्रा. सुचिता शेटे आहेत. 'प्रॅक्टिकल लॅब मॅन्युअल ऑफ हेल्थकेअर सायकॉलॉजी अँड कम्युनिकेशन स्किल्स' या पुस्तकाचे लेखन प्रा. श्रुती राऊत यांनी केले आहे. तर 'लॅब मॅन्युअल ऑफ ह्युमन ॲनाटॉमी अँड फिजिओलॉजी अँड पॅथोफिजिओलॉजी' या पुस्तकाचे लेखन प्रा. अभिषेक भोर, प्रा. ओंकार जाधव आणि प्रा. प्रियांका देठे यांनी केले आहे. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व मार्गदर्शकांनी आपल्या मनोगतात बदलत्या काळानुसार आरोग्य आणि फार्मसी क्षेत्रात मोठे बदल होत असल्याचे नमूद केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आलेली ही पुस्तके विद्यार्थ्यांचे व्यावहारिक ज्ञान, कौशल्य आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यास उपयुक्त ठरतील. तसेच विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनविण्यास या पुस्तकांची निश्चितच मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अध्यापनाच्या कार्यासोबतच पुस्तक लेखनाच्या माध्यमातून ज्ञाननिर्मिती आणि संशोधन क्षेत्रात मोलाचे योगदान दिल्याबद्दल संस्थेच्या वतीने सर्व लेखक प्राध्यापकांचा विशेष सन्मान करण्यात आला.

वाफगाव पोलिस चौकी बनली भूतबंगला

- पोलिस अधिकाऱ्यांची प्रतीक्षा कायम!
- चौकीला नेहमीच टाळे; १७ ते १८ गावांतील नागरिकांची सुरक्षा वाऱ्यावर, तक्रार द्यायची तरी कोणाकडे?
- पोलिस प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ग्रामस्थांमध्ये संताप
- वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देण्याची मागणी





वाफगाव-सोमनाथ साळुंके (दै. आरंभ पर्व)

खेड आणि आंबेगाव या दोन तालुक्यांना जोडणाऱ्या परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उभारण्यात आलेली वाफगाव पोलिस चौकी सध्या धूळखात पडली आहे. चौकीत पोलिस अधिकारी आणि कर्मचारी नियमितपणे उपस्थित राहत नसल्याने या चौकीला नेहमीच टाळे लागलेले दिसते. त्यामुळे परिसरातील नागरिकांवर तक्रारींसाठी थेट राजगुरुनगर येथील पोलिस ठाण्यात जाण्याची वेळ आली असून, पोलिस चौकी असूनही नसल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

खेड आणि आंबेगाव हे तालुके पूर्वी आदिवासीबहुल भाग म्हणून ओळखले जात होते. मात्र, वाढती लोकसंख्या, नागरीकरण आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे या भागातील कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्नही अधिक महत्त्वाचे बनले आहेत. चोरी, दरोडे आणि इतर गंभीर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासनाने ग्रामीण भागात पोलिस ठाणी आणि चौक्यांची उभारणी केली. मात्र, या यंत्रणेचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांना मिळत नसेल, तर अशा चौक्यांच्या अस्तित्वाचा उपयोग काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. खेड तालुक्याच्या शेवटच्या टोकाला आणि धामणी घाटाच्या कुशीत वसलेले वाफगाव हे महत्त्वाचे गाव आहे. या गावाच्या पंचक्रोशीत सुमारे १७ ते १८ गावे आणि अनेक वाड्या-वस्त्या आहेत. या परिसरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी वाफगाव-धामणी मार्गावर सुमारे ३५ ते ४० वर्षांपूर्वी पोलिस चौकी उभारण्यात आली होती. त्यामुळे परिसरातील नागरिकांना सुरक्षिततेचा आधार मिळाला होता. सुमारे दीड ते दोन गुंठे जागेत उभारण्यात आलेल्या या चौकीत पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी चार कौलारू खोल्या बांधण्यात आल्या आहेत. पूर्वी वाहतुकीची आणि दळणवळणाची साधने मर्यादित असतानाही पोलिस अधिकारी व कर्मचारी नियमितपणे चौकीत उपस्थित राहत होते. मात्र, सध्याचे चित्र याच्या अगदी उलट असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

पंचक्रोशीतील नागरिक विविध कामांसाठी किंवा तक्रार नोंदविण्यासाठी चौकीत येतात; मात्र त्यांना अनेकदा बंद दरवाजे आणि कुलूप पाहून परतावे लागते. चौकीत अधिकारीच नव्हे, तर कर्मचारीही उपस्थित नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. परिणामी, तक्रार नोंदविण्यासाठी नागरिकांना सुमारे १५ किलोमीटर अंतरावरील राजगुरुनगर पोलिस ठाण्यात जावे लागते. त्यातही जंगलातून जाणाऱ्या मार्गामुळे नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

महिला अत्याचारांसह विविध गंभीर गुन्ह्यांच्या घटना वाढत असताना ग्रामीण भागातील पोलिस चौकीच बंद अवस्थेत असल्यास एखादी आपत्कालीन घटना घडल्यास जबाबदार कोण, असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. रात्रीच्या वेळी चौकी परिसरात पुरेशी विद्युत रोषणाई नसल्याने अंधाराचाही सामना करावा लागत आहे. त्यामुळे सुरक्षिततेसाठी उभारलेली चौकीच असुरक्षित आणि ओसाड बनल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

परिसरात एखादी गंभीर घटना घडल्यास नागरिकांना दूरध्वनीद्वारे राजगुरुनगर पोलिस ठाण्याला माहिती द्यावी लागते. त्यानंतर पोलिस अधिकारी घटनास्थळी पोहोचण्यासाठी तास ते दीड तासाचा कालावधी लागत असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे तातडीच्या मदतीची अपेक्षा असलेल्या नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या संदर्भात नागरिकांनी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करूनही परिस्थितीत सुधारणा झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. जनतेच्या सुरक्षिततेसाठी उभारलेली पोलिस चौकीच बंद राहत असेल, तर सर्वसामान्य नागरिकांनी न्याय मागायचा कोणाकडे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

चौकी सुरू करण्याची ग्रामस्थांची मागणी

वाफगाव पोलिस चौकीत किमान दिवसातून एकदा तरी पोलिस अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांनी नियमित हजेरी लावावी, तसेच नागरिकांच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी ठरावीक वेळेत कर्मचारी उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी पंचक्रोशीतील नागरिकांकडून होत आहे. रात्रीच्या वेळी चौकी परिसरात पुरेशी प्रकाशव्यवस्था करावी आणि आपत्कालीन परिस्थितीत तातडीने पोलिस मदत मिळेल, अशी व्यवस्था निर्माण करावी, अशीही अपेक्षा व्यक्त होत आहे. पोलिस प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन वाफगाव पोलिस चौकी पुन्हा नियमितपणे कार्यान्वित करावी. अन्यथा जनतेच्या सुरक्षेसाठी उभारलेली चौकी केवळ नावापुरतीच उरण्याची भीती ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. चौकी आहे, इमारत आहे, पण पोलिसच नाहीत; मग सामान्य नागरिकांनी सुरक्षिततेची अपेक्षा कोणाकडून करायची? असा सवाल आता वाफगावसह पंचक्रोशीतील ग्रामस्थ विचारत आहेत.

पुण्यात स्वतंत्र पारधी समाज प्रकल्प कार्यालय स्थापन करा!

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन; दोन लाख फासेपारधी समाजबांधव मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याचा दावा

- गावनिहाय सर्वेक्षण, घरकुल, जात प्रमाणपत्र, शिक्षण व रोजगाराच्या सुविधा देण्याची मागणी
- कार्यवाही न झाल्यास उपोषणाचा इशारा



उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)

पुणे जिल्ह्यातील सुमारे दोन लाख फासेपारधी समाजबांधव आजही मूलभूत सुविधा आणि शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांपासून वंचित असल्याचा गंभीर मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. या समाजाच्या समस्यांचे प्रभावी निराकरण करण्यासाठी पुण्यात स्वतंत्र पारधी समाज प्रकल्प कार्यालय स्थापन करावे, अशी मागणी समाजसेवक नामदेव भोसले आणि जितेंद्र काळे यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानंतरही फासेपारधी समाजाला उपासमार, बेरोजगारी, निवाऱ्याचा अभाव, शिक्षणाच्या अपुऱ्या संधी आणि आवश्यक शासकीय कागदपत्रांसाठी संघर्ष करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अनेक कुटुंबांकडे जात प्रमाणपत्र, रेशनकार्ड आणि इतर आवश्यक कागदपत्रे नसल्याने त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळत नसल्याची बाबही निदर्शनास आणून देण्यात आली.

संशोधन आयुक्त कार्यालय तसेच घोडेगाव आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या कथित मनमानी कारभारामुळे समाजाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप निवेदनकर्त्यांनी केला आहे. त्यामुळे या दोन्ही कार्यालयांच्या कामकाजाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनात पुणे जिल्ह्यातील प्रत्येक गावातील फासेपारधी कुटुंबांचे प्रत्यक्ष गावनिहाय सर्वेक्षण करावे, पात्र लाभार्थ्यांना जात प्रमाणपत्र, रेशनकार्ड, घरकुल, शिक्षण, रोजगार आणि इतर शासकीय योजनांचा लाभ तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशा मागण्यांचा समावेश आहे. तसेच समाजाच्या प्रश्नांवर स्थानिक पातळीवर प्रभावीपणे कार्यवाही होण्यासाठी पुण्यात स्वतंत्र पारधी समाज प्रकल्प कार्यालय सुरू करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली आहे. यावेळी समाजसेवक नामदेव भोसले म्हणाले की, फासेपारधी समाजाला आजही मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. केवळ विकासाच्या घोषणा करून चालणार नाही, तर शासनाने प्रत्यक्ष कृतीतून या समाजाचे जीवनमान उंचावण्यासाठी पुढाकार घ्यावा. उपासमार आणि वंचिततेत जीवन जगणाऱ्या कुटुंबांना सन्मानाने जगण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. या भेटीदरम्यान बारामतीचे प्रांताधिकारी उत्तमराव दिघे, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिराजदार, प्रकल्प अधिकारी संदीप पाटील यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. दरम्यान, निवेदनातील मागण्यांवर तातडीने कार्यवाही न झाल्यास संबंधित आदिवासी प्रकल्प कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा निवेदनकर्त्यांनी दिला आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या प्रश्नात वैयक्तिक लक्ष घालून स्वतंत्र प्रकल्प कार्यालयाच्या मागणीसह अन्य समस्यांवर ठोस निर्णय घेणार का, याकडे पुणे जिल्ह्यातील फासेपारधी समाजबांधवांचे लक्ष लागले आहे. विकासाच्या घोषणा नव्हे, तर मूलभूत हक्क आणि सन्मानाने जगण्याची संधी द्या, अशी आर्त मागणी फासेपारधी समाजाकडून करण्यात येत आहे.

महागाईने ओलांडली लक्ष्मणरेषा!

सर्वसामान्यांचे आर्थिक गणित कोलमडले

किरकोळ महागाई दर ऑक्टोबरमध्ये ६.०९ टक्क्यांवर

कांदा ११६ टक्क्यांनी, तर लसूण ६० टक्क्यांनी महागला



कांदा – ११६.२२ टक्के
लसूण – ६०.७४ टक्के
चांदीचे दागिने – ५२.३९ टक्के
आले – ४८.३२ टक्के
लिंबू – ४७.३० टक्के

नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

आधीच वाढत्या खर्चाने त्रस्त असलेल्या सर्वसामान्य नागरिकांना महागाईचा आणखी एक मोठा झटका बसला आहे. देशातील किरकोळ महागाई दराने ऑक्टोबर महिन्यात ६.०९ टक्क्यांची पातळी गाठली असून, भारतीय रिझर्व्ह बँकेने निर्धारित केलेल्या ६ टक्क्यांच्या कमाल मर्यादेलाही तो ओलांडून गेला आहे. गुरुवारी (दि. १२ नोव्हेंबर) जाहीर झालेल्या सरकारी आकडेवारीतून ही बाब स्पष्ट झाली आहे. विशेष म्हणजे, किरकोळ महागाईत सलग बाराव्या महिन्यात वाढ नोंदवण्यात आली आहे. सप्टेंबर २०२६ मध्ये हा दर ५.५४ टक्के होता. ऑक्टोबर २०२५ मध्ये तो अवघा ०.२५ टक्के होता. एका वर्षाच्या कालावधीत महागाईचा वाढता आलेख सर्वसामान्यांच्या चिंतेत भर घालणारा ठरत आहे.

ग्रामीण भागाला महागाईचा अधिक फटका

महागाईची झळ ग्रामीण आणि शहरी भागात वेगवेगळ्या प्रमाणात जाणवत आहे. ऑक्टोबरमध्ये ग्रामीण भागातील किरकोळ महागाई दर ६.६३ टक्क्यांवर पोहोचला, तर शहरी भागात तो ५.४१ टक्के नोंदवण्यात आला. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर आणि मर्यादित उत्पन्न असलेल्या कुटुंबांच्या खर्चावर अधिक ताण निर्माण होत असल्याचे चित्र आहे.

दैनंदिन जीवनात आवश्यक असलेल्या अन्नधान्याच्या किमतींनीही सर्वसामान्यांचे बजेट बिघडवले आहे. सप्टेंबर महिन्यात ७.७४ टक्के असलेला अन्नधान्य महागाई दर ऑक्टोबरमध्ये वाढून ८.९४ टक्क्यांवर पोहोचला. अवघ्या एका महिन्यात झालेली ही वाढ चिंताजनक मानली जात आहे. ऑक्टोबर महिन्यात काही वस्तूंच्या किमतींमध्ये वार्षिक आधारावर मोठी वाढ नोंदवण्यात आली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने जीवनावश्यक वस्तूंचा समावेश आहे. भाजीपाला, अन्नधान्य आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे सर्वसामान्य कुटुंबांचे मासिक आर्थिक नियोजन कोलमडत आहे. उत्पन्नाच्या तुलनेत खर्चाचा वाढता आलेख पाहता महागाईवर नियंत्रण मिळवण्याचे मोठे आव्हान सरकार आणि आर्थिक यंत्रणांसमोर उभे राहिले आहे.

